संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 7 | Marathi Monthly | Thane, 1 January 2025 to 31 January 2025 | Pages 16 | Price : 10/-

# लोकशाहीचा खून करणारं ‘आधुनिक हत्यार’ ‘EVM’?

## वाचा आणि विचार करा!!!



**‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्यातर्फे, समस्त भारतीय–नागरिकांच्यावतीने... ‘‘रविवार, दि. २६ जानेवारी–२०२५ या ‘अमृतमहोत्सवी–प्रजासत्ताकदिनी’, रात्रौ ठीक ९ वाजता फक्त, पाच मिनिटांसाठी आपापल्या घरातील अथवा इतर ठिकाणचे लाईट्स बंद ठेवून, ‘EVM’विरोधी आपला तीव्र निषेध व्यक्त करा...!!!’’**






भाजप व त्यांची ‘महायुती’ (NDA) सत्तेवर आल्यानंतर, असं काही घडलं आणि घडत गेलं की, भारतीय जनतेचा ईव्हीएम (EVM) वरील विश्वास उडत गेला व आजमितीस तो पूर्णतया उडाल्यानेच, पुन्हा ‘कागदी–मतपत्रिकेवरील’ (Paper-Ballot) मतदानाची मागणी भारतभरातून व्हायला लागलीय...त्याच अनुरोधाने धर्मराज्य पक्ष, या ‘‘EVM हटाव... लोकतंत्र बचाव’’ मोहिमेत हिरिरीने उतरला असून, ‘‘आगामी सर्व प्रकारच्या निवडणुका यापुढे ‘ईव्हीएम (EVM)’ऐवजी मतपत्रिकेद्वारेच घेण्यात याव्यात’’ यासाठी, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने निवडणूक–प्रक्रियेसंबंधाने (EVM हवं की, BALLOT-PAPER...???) अशी ठाणेकरांची ‘जनमत–चाचणी’ मोहीम सुरु करण्यात आलेली असून, त्याचाच भाग म्हणून...


मंगळवार, दि.२४/१२/२०२४ रोजी संध्याकाळी ४ वा. पासून ते ८ वा.पर्यंत, कळवा नाका, शाखेच्या बाजूला, कळवा, ठाणे येथे ‘जनमत–चाचणी’ घेण्यात आली.

...पृष्ठ क्र. ७ वर

अंतरंग



पालकमंत्र्याला कोठून किती हप्ते मिळतात? - शिवराम पाटील
पृष्ठ क्र. ६



दिल्लीश्वर आणि गुजराथी लॉबीला धडका देण्यासाठी, ईव्हीएम अरबी समुद्रात फेकून द्या! - *राजन राजे*
पृष्ठ क्र. ९



मनमोहन सिंग गेले, आता आठवतात ते मात्र पंतप्रधान मोदी! - *राजन राजे*
पृष्ठ क्र. १५

# मानवी चुकांची मोजावी लागलेली किंमत!



**घारापुरीसारख्या जगविख्यात बेटाजवळ, पुन्हा एकदा प्रवासी वाहतूक बोटीला जलसमाधी मिळाली आणि चर्चेचे गुऱ्हाळ सुरु झाले आहे. यामध्ये प्राथमिक स्तरावर आरोपीच्या पिंजऱ्यात प्रवासी बोट चालकाला उभे केले जाणार हा कायद्याचा शिरस्ता आहे. पण, यानिमित्ताने जलप्रवासी सार्वजनिक वाहतुकीची खबरदारी घेतली जाणारी यंत्रणा कुठे पेंड खाते, याकडे फारसे कुणाचे लक्ष नाही, हे महत्त्वाचे कारण आहे आणि म्हणूनच याला जबाबदार असणाऱ्यांची संख्या किंवा यादी फार लांबलचक तयार होईल. पण, सरकारने त्याकडे गांभीर्यांने पाहिले तर, हा मार्ग आपोआप समृद्ध आणि सुरक्षित होऊ शकतो.**

मुळात फेरीबोट किंवा इतर जल वाहतूक प्रवासी बोटी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरतात. यामध्ये प्रवशांना घरी परतण्याची घाई असतेच. त्यात प्रवासी बोटवाल्यांच्या नफेखोरीची हाव हा एक भाग.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जेएनपीटी, ओएनजीसी न्हावे यांचे महाकाय जहाज गेली अनेक वर्षे त्या भागातून ये–जा करतात, काही वेळा समुद्रातच नांगरतात. काही वेळा तिकडे अपघात झाल्यानंतर सर्वच माल, कंटेनर समुद्रातून काढले जातात असेही होत नाही. तेव्हा गाळात ते रुतले जातात. काही अंशी तुटेलेल्या जहाजांचे अवशेषही त्यात असतात.

सर्वात महत्त्वाचा म्हणजे, जेएनपीटीच्या तांत्रिक विभागाचे तिकडे बारीक लक्ष असणारी अत्याधुनिक यंत्रणा आहे. त्यांच्या सर्व्हरवर जहाजांचे मार्ग आणि आराखडा असतो. तो संगणकावर दिसतो. तिकडे कामगार सतत लक्ष ठेवून असतात. परंतु त्यासाठी असणाऱ्या चॅनेलमध्ये आलेला गाळ काढला जात नाही अशीही माहिती उपलब्ध होत आहे, हे धोकादायक आहे.

समुद्राच्या कुशीतील उपेक्षित राहिलेले बुचर आयलँड हे तेलाचे बेट आणि गाव घारापुरीपासून थोड्या अंतरावर आहे. त्यानंतर घारापुरी, जेएनपीटी, न्हावे ओएनजीसी ही महत्त्वाची चार बंदरे आहेत. केंद्र आणि राज्य सरकार हवे तेवढे लक्ष जेएनपीटी सोडले तर, अन्य तीन महत्त्वाच्या बंदरावर देत नसल्याने सामुद्रिक मार्ग, त्यातील अडथळे दूर होवू शकत नाहीत. अर्थात अशा दृष्टीकोनातून तिकडे कुणी पाहत नाही.

**घारापुरी हे गाव फक्त पांडवकालीन लेण्यांकरिता प्रसिद्ध आहे असे नाही; तर, परदेशी पर्यटकांना ते आकर्षण आणि संशोधनाचा खजिना आहे. तिकडे आजही परदेशी पाहुणे घारापुरीच्या प्रेमात आकंठ बुडालेले आहेत, जशी राधा श्रीकृष्णावर भाळली होती, तेच निर्व्याज प्रेम त्या बेटावर आणि तेथील फणसाच्या गऱ्यासारखे असलेल्या ग्रामस्थांवर आहे. राज्य सरकारने तिकडे पर्यटनाची दालने विदेशीस्तरावर खुली केली असती तर, घारापुरी हे वेगळ्या उंचीच्या शिखरावर गेलेले पर्यटनस्थळ आज विकसित झालेले दिसले असते. तेव्हा आपोआप हे जलमार्गसुद्धा अधिक सुरक्षित झाले असते.**

कालच्या अपघाताला अनेक कंगोरे आहेत. ते इतक्यात समोर येणार नाहीत. त्यावर त्वरित अनुमान काढणेही चुकीचे ठरेल. आता फक्त नौदल आणि फेरीवाला बोट यांच्यातील आरोप प्रत्यारोप बघायला मिळत आहेत. अजून मेरी टाईम बोर्ड, भाऊचा धक्कावरील प्रशासन, सागरी नौका नयन खाते, इतर संबंधित यंत्रणेचा सहभाग, जेएनपीटी बंदरातील जहाजांचे वेळापत्रक अशा कायदेशीर आणि तांत्रिक बाजू पुढे यायच्या आहेत. तेव्हा त्या सर्वांच्या अनुषंगाने कंगोरे तपासून बोलणे उचित ठरेल. तूर्तास, हा अपघात मानवी चुकांमुळे झाला आहे, तो टाळता येणे सहज शक्य झाले असते, इतक्या प्राथमिक निर्णयापर्यंत आपण पोहोचू शकतो.

आता राहिला मुद्दा, अपघातानंतर काही जखमी प्रवशांनी हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले. त्यावरूनही अनेक बाबी, रुग्णालयांची क्षमता आणि वैद्यकीय अधिकारी, औषधोपचार याचा आढावा घेतल्यास नव्या वादाला फोडणी मिळू शकते. मात्र, **राज्यात नव्याने सरकार स्थापन झाल्यानंतर काही तासातच ही अपघाताची दुर्दैवी घटना घडल्याने, राज्य सरकारलाही काही लपवाछपवी करावी लागणारच होती, तोही मुद्दा तितकाच महत्त्वाचा होता आणि म्हणूनच १३ जणांना जलसमाधी मिळाल्यानंतर प्राथमिक स्तरावर एकाचा बुडून मृत्यू झाला असे सांगावे लागले. बोट फुटली आणि काही क्षणातच ही दुर्घटना घडली. पण, त्याची आकडेवारी मोजायला सरकारी यंत्रणेला सूर्य बुडण्याची वाट पाहावी लागली हे सुद्धा ध्यानात घेण्यासारखं आहे.**

*– कांतीलाल कडू*

---

जगभरातल्या 'सोशॅलिझम'च्या वाहत्या वाऱ्यांपासून 'गोदी–मिडीया'च्या बदमाषीमुळेच भारतीय जनता अनभिज्ञ रहाते (फ्रान्समधली मुदतपूर्व सार्वत्रिक–निवडणूक डाव्या आघाडीने जिंकल्याच्या बातम्या भारतीय–प्रसारमाध्यमातून गायबच) असंच नव्हे; तर, कट्टर भांडवलदार असलेल्या अमेरिकन प्रसारमाध्यमांतूनदेखील त्याची रुजवात न झाल्याने, अमेरिकन जनतेलाही फारशी माहिती नसते. मात्र, आजही रशिया व चीनमधल्या लोकशाही–हक्कांची गळचेपी होणाऱ्या अथवा अन्य नकारात्मक बातम्यांची पेरणी किंवा खरंतरं 'मारा', सगळ्याच प्रसारणसंस्थांतर्फे सातत्याने व खुबीने केला जात रहातो... त्यामुळेच, 'साम्यवाद–समाजवाद' (Communism-Socialism) या शब्दांविषयी अगदी तिरस्कार नसला; तरी, एक मोठा 'भयगंड' समाजात कायमस्वरुपी असतो, जे भांडवली–व्यवस्थेचं ईप्सितच!

*...राजन राजे* (भाई)

भौतिक–संपन्नतेच्या शिखरावर पोहोचलेला माणूस अस्वस्थ–अशांत का; तर, निर्गल स्वार्थप्रेरित लवलवत्या असंख्य मानवी जिव्हा, आपापला क्षुद्र स्वार्थ साधण्यात मश्गुल असतात...एकमेकांवर कुरघोडी करत जगण्याची एक संवेदनशून्य हिणकस स्पर्धा, म्हणजेच आधुनिक जीणं झालंय आणि त्यात कुणाला काही वावगं वाटण्याची सोयच, 'भांडवली–व्यवस्थे'नं आपल्या 'ॲडम स्मिथ'कृत नतद्रष्ट तार्किक–मांडणीने केव्हाचीच नष्ट करुन टाकलीय! माणूस आतून 'अस्वस्थ–अशांत' का, तर तो मुळातूनच निसर्गाशी असलेलं आपलं 'तादात्म्य' साफ विसरुन गेलाय. तो स्वतःला निसर्गापेक्षा वेगळा; तसेच, जेवढ्या जेवढ्या प्रमाणात तो निसर्गावर आपल्या 'विकृत' बुद्धीच्या बळावर विजय मिळवायला लागलाय...तेवढ्या तेवढ्या प्रमाणात तो स्वतःला निसर्गापेक्षा श्रेष्ठ समजायला लागलाय.

*...राजन राजे* (भाई)

# शिवपुतळ्याच्या धाराशायी होण्याच्या धक्कादायक घटनेबद्दल एका मराठी-ख्रिश्चन माणसाने प्रत्ययकारी लिहीलंय...

## ''जगावं की मरावं...TO BE OR NOT TO BE'' या 'नटसम्राट' नाटकातील स्वगताचा इतका समर्पक उपयोग, कदाचित त्या नाटकासाठीही झाला नसेल, तितका ''सॅबी परेरा''नं या लेखात केलाय. हॅट्स ऑफ टू यू सॅबी....



उभं राहावं की मोडून पडावं, हा एकच सवाल आहे. ह्या मालवणच्या राजकोट किल्ल्यावर भ्रष्टाचाराच्या भुशाने भरलेला भुसभुशीत धातूंचा पुतळा होऊन उभं राहावं, बेशरम लाचार आनंदानं? की फेकून द्यावं, या बेगडी देहाचं लक्तर समुद्राच्या अथांग लाटांवर?

...आणि करावा, भ्रष्टाचारी राजवटीचा शेवट, एकाच प्रहाराने? माझा, तुझा, ह्याचा अन् त्याचाही!

काळाच्या इवल्याशा तडाख्याने माझ्या अस्तित्वालाच असं नख लावावं.... की, नंतर होणाऱ्या छिन्नविच्छिन्न तुकड्यांना नसावा जागृतीचा किनारा कधिही...

पण, मग...

पण, मग... त्या छिन्नविच्छिन्न तुकड्यांच्या स्वप्नातही भवानी माता येऊ लागली तर? त्यांनाही पुन्हा संपूर्ण स्वराज्याचं स्वप्न पडू लागलं तर? आपल्या नावाचं राजकारण करणारे 'औरंगे', त्यांच्याही डोळ्यात सलू लागले तर?

तर... तर...

इथेच मेख आहे...जुन्या धेंडांच्या काळ्या कारनाम्यांना कंटाळून, आपण नव्यांच्या हाती कारभार सोपवावा अन् ते नवे, जुन्यापेक्षाही गयेगुजरे निपजावेत?

काही काळ आम्ही सहनही केली ती नव्याची नवलाई, मिरविण्याची घाई, जनतेप्रती बेपर्वाई! सहन केले प्रेताच्या निर्जीवपणाने अभिमानावर होणारे अत्याचार...

आमच्या माता बहिणींवर होणारे बलात्कार, अस्तित्वाच्या गाभाऱ्यात असणाऱ्या सत्वाची विटंबना... आणि, आज अखेर सहनशक्तीचा बांध फुटून कोसळून पडलो, या दर्यामातेच्या पायाशी...

विधात्या, तू इतका कठोर का झालास?

एका बाजुला आम्ही ज्यांच्या हाती सत्ता दिली, त्यांनी आमचा वापर करुन घेतला आणि दुसऱ्या बाजुला आमच्या सन्मानाच्या नावाखाली त्यांनी आमचे असे कचकड्यांचे पुतळे उभारले?

पण मग, या कोसळलेल्या पुतळ्याच्या, विस्कटलेल्या लोखंडाचे, पत्र्याचे अन् काँक्रीटचे भग्नावशेष घेऊन, हे करुणाकरा.

या छत्रपतींनी कुणाकुणाची बोटं छाटावीत? कुणाकुणाची मुंडकी उडवावीत? कुणाकुणाचा टकमक टोकावरुन कडेलोट करावा? कुणाकुणाचा 'चौरंग' करावा? कुणाचा? कुणाचा?? कुणाचा???

*...सॅबी परेरा*

# माफी मागताना शिवाजी महाराजांच्या सोबतीने दुसऱ्या कुणाची नावं घेणं, हा थिल्लरपणा आहे

**तुमच्या माझ्यासारखा हाडामांसाचा माणूस प्रबळ इच्छाशक्ती, उदात्त ध्येय आणि बुद्धिमान आईवडिलांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर बुद्धिमत्ता वापरुन काय करु शकतो, याचं उदाहरण म्हणजे शिवाजी महाराज.**

शिवाजी महाराजांची कुणाशीही तुलना होऊच शकत नाही...

**शत्रूच्या स्त्रियांना सन्मानाने वागवावे, हा नुसता राजकीय आदेश नसून महाराजांच्यावर असणारे त्यांच्या मातोश्रींचे संस्कार होते, तिथं याच गुणाला 'सद्गुण विकृती' म्हणणारा, महाराजांच्या पायाजवळ सुद्धा उभा राहू शकत नाही!**

**शिवाजी महाराजांनी स्वप्नातही देशद्रोह केला नाही, भारताला स्वातंत्र्य मिळत असताना, देशातल्या संस्थानिकांना 'स्वतंत्र राहा' अशी गुपचूप पत्रं पाठवणाऱ्या माणसाला, महाराजांनी काय दंड दिला असता?**

लष्करी पराभव झाल्यावर तह करून जीवावरचे संकट आलेले असताना, धाडसाने त्यातून सुटून आग्र्याहून माघारी आल्यावर महाराजांनी स्वस्थ न बसता, गेलेले किल्ले, मुलुख जिंकलाच; पण, दक्षिणेत सुद्धा राज्यविस्तार केला. माफी मागून पेन्शन घेऊन महाराज गप्प बसले नाहीत...

त्यामुळे, गुर्मीत आणि दमाच्या भाषेतला माफीनामा... ही फक्त, विधानसभेच्या तोंडावर केलेली मलमपट्टी आहे, मनापासून मागितलेली माफी आणि नाईलाजाने केलेलं ढोंग...यातला फरक मराठी माणसाना उत्तम समजतो.

*...आनंद शितोळे*

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# वाचा आणि गप्प बसा...

**विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर, दोनच दिवसांनी, मलबार हिल, या उच्चभ्रू समाजाचं वास्तव्य असणाऱ्या परिसरातील, एका मारवाडी भडव्याने, माझ्या एका मध्यमवर्गीय भगिनीला, मारवाडी भाषेतच बोलावं लागेल असं तोऱ्यात सांगितलं... का? तर म्हणे, आता मुंबईसह महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आलंय. एवढी मस्ती आणि एवढा माज या हलकटांना येतो कुठून? तर, तो येतो तो, मराठी माणूस जातीपातीत व विविध राजकीय पक्षांत विखुरला गेलाय त्यातून...** सार्वजनिक सत्यनारायणाच्या महापूजा, सार्वजनिक गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सव, दहीहंडी, साईबाबांच्या शिर्डीला जाणाऱ्या पायी पालख्या, भंडारे... या फुकटेपणात मराठी माणूस, विशेषतः मराठी तरुणाई इतकी गुरफटून गेलीय की, ''मराठी अस्मिता-महाराष्ट्रधर्म'' याचं कोणतंही भान, नाक्यानाक्यांवर नेमल्या गेलेल्या मावळ्यांना राहिलेलं नाही... नेमका याचाच फायदा, गेल्या पन्नासएक वर्षांपासून महाराष्ट्रभरातील सर्वच धंदेवाईक मराठी-नेत्यांनी उचलला आणि त्यातूनच कुणी साहेब, दादा, अण्णा, भाई, दानवीर, शूरवीर, कर्मवीर, मर्मवीर, धर्मवीर बनले आणि त्यांच्या राजकीय व मनगटी ताकदीचा वापर करुनच अवघ्या महाराष्ट्रातल्या कामगारविश्वात कंत्राटी-कामगार पद्धत, आऊटसोर्सिंग, NEEM वगैरेचा अंधःकार पसरत गेला... आणि, मराठी माणसाला, या





राजकीय नेत्यांनी अगदी पद्धतशीरपणे निरोधसारखा वापरुन घेतला. एकाने मराठीच्या मुद्द्यावर मराठी पोरांना, हिंदुत्वाच्या फसव्या वातावरणात रमवलं; तर, दुसऱ्याने पुरोगामित्व आणि सर्वधर्मसमभावाच्या गोंडस नावाखाली 'जातीयवादी' बनवलं... नेमका याचाच फायदा, जैन-गुजराथी-मारवाडी व इतर परप्रांतीय भाषिक भांडवलदारवर्गाने उचलत, गाफील असणाऱ्या मराठी माणसाला चुचकारण्याचा यशस्वी प्रयत्न केला. तो साहिल शहा नावाचा हरामजादा, मराठी माणसाबद्दल सोशल मीडियातून जे काही म्हणालाय, ते योग्यच आहे... ''एक वडा आणि दोन पाव, आम्ही सगळे भाडखाव'' अशीच अवस्था आज, या राजकारण्यांनी आपली करुन ठेवलीय. इतकं घडूनही, देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदे यांच्या तोंडून एकही अवाक्षर निघालेलं नाहीये; कारण, या विधानसभा निवडणुकीत अदानीचा पैसा लागलेला होता... **महाराष्ट्रातील उद्योग गुजराथला पाठवून, मुंबई विकायची सुपारीच विद्यमान सत्ताधाऱ्यांनी घेतलेली आहे. जोपर्यंत मराठी माणूस, जातपात व पक्षभेद-राजकारण विसरुन, महाराष्ट्रधर्माचं रक्षण करण्यासाठी एकत्र येत नाही, तोपर्यंत 'मराठी अस्मिता' अशीच पायदळी तुडवली जाणार... शिवाजी महाराज पुन्हा जन्माला येऊ शकत नाहीत; पण, प्रभाकरनसारखा एखादा कडवट ''मराठी माणूस'' नक्कीच जन्माला येऊ शकतो !!!**

**।। जय शिवराय... जय महाराष्ट्र ।।**

**संयुक्त महाराष्ट्रानंतर... आता, स्वायत्त महाराष्ट्र !!!**

# वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या, ठाणे शहरातील बांधकाम प्रकल्पांवर बंदी आणण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) :** गेल्या काही कालावधीपासून ठाणे शहरातील वातावरण प्रदूषित झालेले असून, शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा मेट्रो प्रकल्प आणि ठिकठिकाणी सुरु असलेली निवासी प्रकल्पांची बांधकामे, यामुळे ठाण्याची हवा दुषित होऊन, हवेचा स्तर पूर्णपणे घसरलेला दिसून येत आहे. परिणामी, खोकला आणि दम्याच्या आजारात मोठ्याप्रमाणात वाढ झाल्याचे आढळून येत आहे. मुंबईचे धाकटे भावंड, अशी ठाणे शहराची ओळख गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली असतानाच, ठाण्याचे नागरीकीकरणही तेवढ्याच प्रचंड प्रमाणात झालेले आहे. ठाणे शहराची वाढती लोकसंख्या ही, वाढत्या वाहतूक कोंडीलादेखील कारणीभूत ठरत आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे, आधीच वायुप्रदूषण आणि ध्वनीप्रदूषणामुळे ठाणेकर नागरिक त्रासलेले असतानाच, सध्या ठाणे शहरात मोठ्याप्रमाणात सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे, एकेकाळी तलावांचे शहर अशी ओळख असणाऱ्या ठाण्याची ओळख आता, 'प्रदूषित शहर' अशी निर्माण झालेली आहे. सद्यस्थितीत ठाणे शहरातील हवेचा दर्जा पूर्णपणे घसरलेला असल्याचे, प्रसिद्धीमाध्यमांतील बातम्यांच्या माध्यमातून स्पष्ट झालेले आहे. गेल्या काही वर्षांत, घोडबंदर महामार्गालगत अनेक निवासी संकुले उभी राहिली आहेत आणि आजही मोठमोठ्या निवासी संकुलांची/प्रकल्पांची बांधकामे सुरु आहेत. वाघबीळ परिसरातील हिरानंदानी-



मेडोज याठिकाणी, गेल्या काही दिवसांपासून एका मोठ्या प्रकल्पाचे खोदकाम सुरु असून, अनेक जेसीबी मशिन्सच्या माध्यमातून हे काम दिवस-रात्र सुरु असते. या खोदकामामुळे मोठ्याप्रमाणात धुरळा उडून, परिसरातील नागरिकांना याचा त्रास होत आहे. असे असतानाही, ठाणे शहरातील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी, महापालिका प्रशासनाकडून याबाबत कोणतीही दाखल घेतली जात नाही. याच अनुषंगाने, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सचिव-सदस्य अविनाश ढाकणे आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव यांना पत्र पाठविण्यात आले असून, वायुप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या ठाणे शहरातील बांधकाम प्रकल्पांवर बंदी आणण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, मुंबईच्या हवेचा स्तर वाईट झालेला असल्याकारणाने, तसेच बोरीवली पूर्व आणि भायखळा या परिसरांतील हवा 'अतिवाईट' श्रेणीत गेल्याने, तेथील सर्व बांधकामे बंद करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला आहे. ज्या विभागातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक २००च्या वर जाईल, त्या विभागातील सर्वच बांधकामे बंद करण्याचे आदेश मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले असल्याचे प्रसिद्धीमाध्यमांद्वारे स्पष्ट झालेले आहे. याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने पत्राद्वारे सूचित करण्यात आले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर, ठाणे शहरातील वायुप्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या किंवा ठरु पाहणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर कठोर निर्बंध लादण्यात यावेत. बांधकामांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी, सविस्तर मार्गदर्शक सुचना तयार करण्यात याव्यात, त्याचप्रमाणे बांधकामाच्या ठिकाणी नियमावलीचे योग्य पालन न झाल्यास, सरसकट सर्वच बांधकामे बंद करण्याचा कठोर निर्णय घेण्यात यावा. तसेच, ठाणे शहरातील घोडबंदर महामार्गाच्या गायमुख परिसरासह, इतर ठिकाणी असलेले आरएमसी प्लांट त्वरित बंद करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्राच्या माध्यमातून अविनाश ढाकणे आणि सौरव राव यांच्याकडे केली आहे.

# वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांवर, 'टायर किलर' कारवाई अधिक कठोरपणे राबविण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी!

**ठाणे (प्रतिनिधी) :** वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन, विरुद्ध दिशेने वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर आता, 'टायर किलर'च्या माध्यमातून कारवाई करण्यात येणार असल्याचे वृत्त, प्रसिद्धी माध्यमांद्वारे प्रकाशित झालेले आहे. एक दिशा मार्ग असतानाही, काही वाहन चालक वाहतूक नियमांचे उल्लंघन करीत, थेट विरुद्ध दिशेने आपली वाहने हाकत असतात. अशा बेशिस्त वाहन चालकांवर वचक बसावा यासाठी, ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी 'टायर किलर'चा प्रयोग केला जाणार आहे. ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून, येत्या पंधरवड्यात हे 'टायर किलर' बसविण्यात येणार असून, विरुद्ध दिशेने वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या चाकांचे यामुळे नुकसान होईल आणि परिणामी, वाहन चालक स्वतःहून विरुद्ध दिशेने आपली वाहने चालविणार नाहीत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास, ठाणे शहरातील इतर भागांतदेखील अशापद्धतीचे 'टायर किलर' बसविण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीमाध्यमांतून स्पष्ट झालेले आहे. बेशिस्त वाहन चालकांना चाप बसावा यासाठी ठाणे महानगरपालिका आणि ठाणे वाहतूक शाखा यांच्याकडून, संयुक्तपणे राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने मनःपूर्वक स्वागत करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव आणि ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त पंकज शिरसाठ यांना पाठविलेल्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे की, ठाणे शहरातील वाहतूक कोंडी, सेवारस्ता (सर्व्हिस रोड) आणि मुख्य रस्त्याच्या विलीनीकरणास विरोध, ठाणे शहरातील रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत कठोर धोरण अमलात आणणे, सेवारस्त्यावरील (सर्व्हिस रोड) मोफत वाहनतळाबद्दलचे निकष, ठाणे शहरातील वाहतुकीत प्रायोगिक तत्त्वावर बदल करण्यापूर्वी करण्यात आलेल्या सूचनांचा विचार, ठाणे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची दुरवस्था, ठाणे शहरातील रस्ते आणि पदपथ यांची सुव्यवस्था, रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंग नियमावलीनुसार रंगविण्यात येणे, इत्यादी विषयांसंदर्भात 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने ठाणे महानगरपालिका आणि ठाणे वाहतूक शाखा यांच्याकडे



सातत्याने पत्रव्यवहार तसेच, पाठपुरावा करण्यात आलेला आहे. याच अनुषंगाने, ज्यापद्धतीने प्रायोगिक तत्त्वावर, छत्रपती शिवाजी महाराज पथ येथून गावदेवी मंदिराच्या दिशेने, गावदेवी मैदानालगतची एक दिशा मार्गिका, सुभाष पथ, गावदेवी मंदिर परिसर आणि बी-केबिन परिसर याठिकाणी 'टायर किलर'चा प्रयोग राबविण्यात येणार आहे; त्याचप्रमाणे राममारुती मार्गावरुन छत्रपती संभाजी महाराज पथ आणि सत्यम कलेक्शनजवळील वाघोळकर हॉस्पिटलच्या शेजारुन राममारुती मार्गावर निघणाऱ्या एक दिशा मार्गांवरदेखील 'टायर किलर' बसविण्यात यावेत, अशी मागणी महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रातून केली आहे. दरम्यान, याठिकाणी कधीही वाहतूक पोलीस आढळून येत नसल्याने, बेशिस्त वाहन चालक बिनधास्तपणे, विरुद्ध दिशेने वाहने चालवताना दिसून येतात. ठाणे रेल्वे स्थानक परिसरात, दररोज हजारो वाहनांची वाहतूक होत असते. यामध्ये रिक्षा आणि दुचाकी वाहनांचे प्रमाण अधिक आहे. ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी, वाहतूक विभागाकडून काही ठिकाणी एक दिशा मार्गिका तयार केलेल्या असल्या तरी, या मार्गिकांवर वाहतूक पोलीस आपले कर्तव्य बजावताना कधीही दिसून येत नाही. गावदेवी मंदिर आणि गावदेवी भाजी मंडई (ठाणे महानगरपालिकेचे लोकमान्य टिळक दिव्यांग उद्यान) या ठिकाणी एक वाहतूक पोलीस मात्र, चार प्रवासी घेऊन जाणाऱ्या रिक्षांचे आपल्या मोबाईलवर छायाचित्र काढण्यापलीकडे दुसरे काहीही करीत नाही, याकडेही ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त आणि ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त यांचे लक्ष वेधण्यात आलेले आहे. काही वाहन चालक विशेषतः बेशिस्त रिक्षाचालक विरुद्ध दिशेने या एक दिशा मार्गिकांमध्ये प्रवेश करीतच असतात. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन, वाहतुकीची मोठ्याप्रमाणात कोंडी होते आणि यामुळे अपघाताची दाट शक्यताही निर्माण होत असते. तरी, 'धर्मराज्य पक्षा'च्या सूचनांकडे दोन्ही प्रशासनांनी गांभीर्याने लक्ष देत, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या, वाहन चालकांवर करण्यात येणाऱ्या, 'टायर किलर' कारवाईबाबत, अधिक कठोरपणे पाऊले उचलावीत, अशी आग्रही मागणी महेशसिंग ठाकूर यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव आणि ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त पंकज शिरसाठ यांच्याकडे आपल्या पत्राद्वारे शेवटी केली आहे.

---

**१९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, माधव गडकरी इ. अगदी मोजकेच अपवाद वगळता महाराष्ट्रातील, गोविंद तळवलकर, कुमार केतकर ते आजचे आमच्या पिढीतील संजय आवटे आणि श्रीरंजन आवटे इ. नावारूपाला आलेल्या पत्रकार/विचारवंत आणि स्तंभलेखकांनी महाराष्ट्रातील मराठी जनतेला दिल्लीच्याच चष्म्यातून महाराष्ट्राकडे पाहण्याची रीत अकारण येथे रुजवली आणि रुजवण्याचा प्रयत्न आजही ही मंडळी करतच आहेत.**

महाराष्ट्रातील सर्वसामान्य मराठी नागरिक, विशेषत: मराठी तरुणांनी या 'भारतीय विचारवंतांना' फाट्यावर मारून यापुढील काळात तरी केवळ आपला महाराष्ट्र, आपली भूमी, आपली मातृभाषा, आपले स्थानिक प्रश्न, आपल्या कुटुंबातील भावी पिढीचे महाराष्ट्रातील भवितव्य काय? याचाच विचार केला पाहिजे. कारण, समाजात 'प्रतिष्ठित' म्हणून वावरणाऱ्या या So Called विचारवंतांना, भाजपला सत्तेबाहेर फेकून त्याजागी काँग्रेसला (गांधी-नेहरू) बसवायचे, इतक्याच अतिशय मर्यादित उद्दिष्टानेच ही मंडळी महाराष्ट्रात कार्यरत होती आणि आहेत.

– पण, काँग्रेस सत्तेवर येऊनही परिस्थितीत बदल होणार नाही कारण, हे दोन्ही पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू, दोन्ही पक्षांना राज्यघटनेतील संघराज्य व्यवस्था (Federal Structure) मान्यच नाही. हे वास्तव ही पत्रकार आणि विचारवंत मंडळी समाजासमोर येऊच देत नाहीत. **असं करून, महाराष्ट्राचा मोठाच विश्वासघात आणि नुकसान ही मंडळी करत आली आहेत, करत आहेत आणि भविष्यातही करणार आहेत, यात शंकाच नाही. कारण, महाराष्ट्राच्या प्रश्नांपेक्षा त्यांना आपला 'उदारमतवादी मुखवटा' आणि इंप्रेशन जास्त महत्त्वाचे वाटते!**

**त्यामुळे महाराष्ट्रातील मराठीजनांचे प्रश्न तरी कधीही सुटणार नाहीत, हे सूर्यप्रकाशाइतकेच स्वच्छ आहे. शेवटी जाता जाता इतकेच सांगतो की, आजच्या महाराष्ट्राचा जो आतोनात ऱ्हास होत आहे, त्यासाठी केवळ राजकीय पक्षांनाच दोष न देता, काँग्रेसनं पोसलेल्या या** So Called **'राष्ट्रीय विचारसरणीच्या उदारमतवादी विचारवंतांनीच' महाराष्ट्राचे कितीतरी मोठे नुकसान केले आहे. कारण, आपल्या या महाराष्ट्रभूमीशी, आपल्या या मातृभूमीशी काही बांधीलकी जपली पाहिजे, अशी कृतज्ञतेची जाणिवच त्यांना नाही! ते मणिपूरबद्दल बोलतील पण, महाराष्ट्रातील मराठी जनतेच्या दुर्दशेवर बोलणार नाहीत, जागृती करणं तर दूरच!**

त्यामुळेच, परप्रांतातून आलेल्या लोकांचं फावले आहे आणि आज ती एका बाजूला महाराष्ट्राला, इथल्या संस्कृतीला, मराठीला विरोध करीत आहेत तर, दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे लचकेही तोडत आहेत. भविष्यात त्यांना आणखीन तसे करू देणार का? याचा विचार मात्र आता आपणच सर्वसामान्य महाराष्ट्र-प्रेमींनी करायचा आहे.....नव्हे तो करावाच लागेल अन्यथा आपल्याच भावी पिढ्यांकडून शिव्याशाप खाण्याची तयारी ठेवा.

*–रुद्रेश सातपुते*

# पालकमंत्र्याला कोठून किती हप्ते मिळतात ?

पालकमंत्री म्हणजे एका जिल्ह्याचा मुख्यमंत्री. जिल्हा विकास नियोजन समितीला मिळणाऱ्या निधीची विल्हेवाट लावण्याचा मक्ता (ठेका) पालकमंत्र्याकडे असतो. पाहिजे तितकी चोरी करू शकतो. एक मंत्री पालकमंत्री बनला किंवा बनवला तर, एका वर्षात कमीतकमी दोनशे कोटी कमवू शकतो. असे आजपर्यंतचे आकडे सांगतात. जिल्हा विकास नियोजन समिती म्हणजे निधी वाटपाचे दुकान असते. जळगावला पंधरा टक्के द्या आणि निधी घ्या. तो निधी कामासाठी वापरा किंवा नका वापरू, कोणी विचारणार नाही. ही हमी पालकमंत्री घेतो. धुळे येथे हाच दर पंचवीस टक्के होता. असा दर प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळा असतो. बिचाऱ्या करदाता आणि मतदाराला हे माहितही नसते, माझा कर कसा चोरी होतो? माझा आमदार कशी चोरी करतो?

**या चोरीत पालकमंत्री जिल्ह्यातील सर्वच आमदार खासदारांना सहभागी करून घेतो. कलेक्टर हा या चोर समितीचा सचिव असतो. त्याच्याच सहीने हा निधी ट्रेझरीमधून बाहेर पडतो. या चोरांना अडवणारा कलेक्टर अजूनतरी कोणत्याही मातेने जन्माला घातला नाही. कोणत्याही बापाने चांगला संस्कार केला नाही. याच चोरांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त, स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण केले जाते. अनेक बावळट नागरिक ठेवणीतील कपडे इस्तरी करून घालून हजेरी लावतात.** त्याबद्दल त्यांना एक चॉकलेट दिले जाते. जेणेकरून पालकमंत्र्याचे भाषण संपताच टाळी वाजवली पाहिजे. टाळी वाजवून आपण गब्बर सिंगला रामगड लुटण्यासाठी सहमती प्रदान करतो. यात अधिकतम रिटायर मिलीटरीमन असतात. त्याला एक्स सर्व्हिसमन म्हणतात. तो जरी चीन पाकिस्तानमधील शत्रूला गोळी घालत होता पण येथे फक्त टाळी वाजवतो. देशांतर्गत शत्रूला गोळी घालत नाही. तो क्रांतीवीरमधील राजकुमार किंवा नाना पाटेकरचा रोल करीत नाही.

आता कळले, पालकमंत्री बनण्यासाठी मंत्री का रूसवे फुगवे करीत आहेत? नसेल कळले तर, माजी पालकमंत्री सतीश पाटील किंवा माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर यांना भेटून सविस्तर माहिती घ्यावी. एकनाथ खडसेंना सुद्धा याबाबत इत्यंभूत माहिती आहे. पण त्यांना अजूनही पालकमंत्री बनण्याची अपेक्षा आहे. सतीष पाटील आणि गुलाबराव देवकर यांना तशी भविष्यात संधी नाही. म्हणून ते प्रामाणिकपणे सांगतील. अशी मला अपेक्षा आहे. शेवटी शेवटी तर, रावण सुद्धा सत्य सांगून जातो की मला रामाच्या हातून मरण पाहिजे होते म्हणून मी सीतेला पळवून नेले होते. तर यांनी पण सांगितले तर खूप उपकार होतील.



महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस उठसूठ छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव घेतो. स्वत:ला मराठा मराठा म्हणून मिरवतो. पण येथे मराठी बाणा हरवलेला दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे दहा वेळा नांव घेतात तर, एकदा तरी त्यांच्यासारखा मराठी बाणा दाखवला पाहिजे.

**मला माझे साथीदार सांगतात. तुम्ही एखाद्या पक्षात जाऊन निवडणूक लढवली तरच विजयी होणार. मी म्हणतो, मी भारतातील कोणत्याही पक्षात जायला तयार आहे. पण मला कोणी घेत नाही. म्हणे तुम्ही आपल्याच पक्षातील आमदार, खासदार, मंत्री, पालकमंत्री, मुख्यमंत्र्याला भ्रष्टाचार करू देणार नाहीत. कारण भ्रष्टाचार केल्याशिवाय कोणीच आमदार, खासदार, मंत्री, नगरसेवक निवडणूक लढत नाहीत. भ्रष्टाचार हाच तर राजकीय पक्षांचा मेन अजेंडा असतो. मग तो पक्ष मोदींचा असो किंवा पवारांचा किंवा ठाकरेंचा किंवा राहुल गांधींचा. खात्री करण्यासाठी आमदार, खासदार, मंत्रींची संपत्ती मोजून पहा.**

जळगाव जिल्ह्यातील एक राजकीय कार्यकर्ता व्हिडिओ वर म्हणाला होता की, जळगाव जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत पैशांचा पाऊस पडला होता. हा व्हिडिओ इंग्लंडमधे सुद्धा पाहिला. पण यातील पूर्ण सत्य हे आहे की, एकिकडे पैशांचा पाऊस होता तर दुसरीकडे पैशांचा फव्वारा होता. नेते, कार्यकर्ते, मतदार यात न्हाऊन निघाले.

***...शिवराम पाटील***

***(सोशलमीडियातून साभार)***



(सोशलमीडियातून साभार)

## लोकशाहीचा खून करणारं ‘आधुनिक हत्यार’ ‘EVM’?...

...पृष्ठ क्र. १ वरुन

**...यापूर्वीही, “EVM हवं की, BALLOT-PAPER” यासाठी ‘जनमत-चाचणी अथवा सार्वमत’ (Referundum)....**

१) १० डिसेंबर (मंगळवार)-२०२४च्या ‘विश्वमानव-दिवस’ किंवा ‘जागतिक मानवी-हक्क दिना’चं औचित्य साधत ठाणे रेल्वेस्थानक येथे....

२) बुधवार, दि. ११/१२/२०२४ रोजी, संध्याकाळी ४ वा. पासून ते ८ वा.पर्यंत, वर्तकनगर नाका, (सह्याद्री मेडिकल स्टोअर्सजवळ) ठाणे (प) येथे....

३) गुरुवार, दि.१२/१२/२०२४ रोजी, संध्याकाळी ४ वा. पासून ते ८ वा.पर्यंत, ठाणे जनता सहकारी बँक, खोपट नाका, ठाणे (प) येथे....

४) सोमवार, दि. १६/१२/२०२४ रोजी, संध्याकाळी ४ वा. पासून ते रात्रौ ८ वा. पर्यंत ठाण्यातील मनोरमा नगर, टीएमटी बस स्टॉप येथे....

५) बुधवार, दि.१८/१२/२०२४ रोजी, संध्याकाळी ४ वा. पासून ते ८ वा.पर्यंत, आनंद टॉकीजजवळ, कोपरी, ठाणे (पू.) येथे...

६) शुक्रवार, दि.२०/१२/२०२४ रोजी, संध्याकाळी ४ वा. पासून ते ६ वा. पर्यंत, जांभळी नाका (शिवाजी मैदानासमोर), ठाणे (प.) येथे, ‘ईव्हीएम’विरोधी जनजागृती आंदोलन करण्यात आले.

तसेच, ठाण्यातील विविध ठिकाणी “EVM हवं की, BALLOT-PAPER” यासाठी ‘जनमत-चाचणी अथवा सार्वमत’ ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्या...धन्यवाद!

**“अमृतमहोत्सवी प्रजासत्ताकदिनी ‘EVM’चा निषेध होणार बुलंद... २६ जानेवारी-२०२५ रात्रौ ९.०० वा. ५ मिनिटे सगळे लाईट्स बंद...!!!”**




- “जो ‘गौतम अदानी’ को बचाते हैं,
वो ‘EVM’ से चुनाव लड़ाते हैं...!!!”
“स्वतंत्रता-संग्राम में जो ‘बुलेट’ से ड़रे,
वो अब ‘बॅलेट’ से ड़र रहे हैं...!!!”

- “हॅकिंगची बात सोडा; EVM हवं तसं ‘प्रोग्रॅम’ करुन मतमोजणीचा निकाल ‘मॅनेज’ करणं...हा संगणकतज्ज्ञांच्या डाव्या हातचा मळ”, इति एलिऑन मस्क / माधव देशपांडे
NO BALLOT-PAPER...NO ELECTION

- “हुकूमशाहीरुपी राक्षसाचा ‘प्राण’ EVMच्या ‘पोपटा’त दडलेला...पोपट मारा, तरच राक्षस मरेल”; अन्यथा, लोकशाहीची ‘शंभरी’ भरेल!
“स्वातंत्र्याची दुसरी लढाई EVM हटवा...‘स्वातंत्र्य’ वाचवा!!”

- “जिंकलात तर स्वत:मुळे आणि हरलात तर EVM मुळे” या विरोधी पक्षांवरील ‘सर्वोच्च न्यायालया’च्या अर्वाच्य टीकेचा धिक्कार असो... धि:कार असो !
“EVM हवं की, नको” हा सवाल, राजकीय पक्षांचा कमी आणि आम जनतेचा जास्त आहे... आम्ही देशाचे मालक आहोत... तुम्ही सारे, आमच्यातर्फे नेमले गेलेले ‘पगारी नोकर’ आहात...
जय संविधान, जय प्रजासत्ताक!!!
EVM हटवा... प्रजासत्ताक वाचवा!

- उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालय, राज्यघटनेचे ‘रक्षक’...ती सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालची मांजरे नव्हेत!
तेव्हा, EVM मधून ‘मतचोरी’ होताना; त्यांनी वाघासारखं गुरगुरलं पाहिजे आणि पंजा मारुन EVM ला आडवं केलं पाहिजे!
EVM हटाओ...लोकतंत्र बचाओ!
NO BALLOT-PAPER...NO ELECTION

- ज्यांनी स्वातंत्र्य-चळवळीत कधि ‘भाग’ घेतला नाही...तेच, आज आपल्या स्वातंत्र्याचा ‘घास’ घ्यायला निघालेत! तेव्हा ते घाबरले ‘बुलेट’ला...आज घाबरतायत ‘बॅलेट’ला!!
“स्वातंत्र्याची दुसरी लढाई, EVM हटवा... ‘स्वातंत्र्य’ वाचवा!!!”

- निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय... देशातील नागरिकांची अत्यंत लाजिरवाणी व क्रूर चेष्टा करताहेत. दिलेली मतं ‘EVM’मध्ये दिसत नव्हती, म्हणून त्यांनी VVPAT आणलं... परंतु, मतं मोजतायत कुठली, तर, न दिसणारी EVM मधलीच... वा रे वा! मतपत्रिका मोजणे, हे एव्हरेस्ट शिखर चढण्याएवढे वा डोंगर खोदण्याएवढं अवघड काम आहे काय...???
EVM ✗ Ballot Paper ✓

- जरी संपूर्ण जगाने ‘ईव्हीएम’चा त्याग केलेला असला तरी... EVM मुळे ‘सत्ताधारी’ बनलेले, कुठल्याही स्थितीत ‘EVM’ शिवाय निवडणूक लढवणे शक्यच नाही; त्यासाठी, स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढावी लागेल... तुरुंगवास पत्करण्याची आणि स्वत:चं रक्त सांडवण्याची तयारी ठेवावी लागेल...!!!
NO BALLOT-PAPER...NO ELECTION

- EVM मॅनेज होवोत या न होवोत....
“ती एकूणच संशयास्पद प्रक्रिया आहे”, असं ‘एलिऑन मस्क’सह, अवघे जग म्हणत असताना “कुठल्याही परिस्थितीत EVM शिवायच कागदी-मतपत्रिकेवर शिक्का मारुन निवडणुका व्हायला पाहिजेत. हा, या प्रजासत्ताकाचा ‘जनादेश’ आहे... मग, प्रश्नच कुठे येतो?
NO BALLOT-PAPER...NO ELECTION

...पृष्ठ क्र. ८ वर









...पृष्ठ क्र. ७ वरुन

- जनता जागी झालीय...आपल्या बहुमूल्य मतांची 'EVM'च्या तिजोरीमधून 'चोरी' होतेय; हे तिला उमगलंय...तेव्हा सत्ताधाऱ्यांनो, मतपत्रिकेवर निवडून या; नाहीतर, खुर्च्या खाली करा!
  NO BALLOT-PAPER... NO ELECTION

- India destined for 2nd 'War Of Independence'...this time, against those, who never fought the 1st one!
  निवडणुकीत प्रभाव कोणाचा... "लाडक्या 'बहिणी'चा की, लाडक्या 'ईव्हीएम' (EVM) चा?"
  EVM हटाओ...लोकतंत्र बचाओ!

- २६ जानेवारी-२०२५ला कसा साजरा करु प्रजासत्ताकाचा 'अमृतकाळ'...
  'EVM' जर लोकशाहीचा बनलीय 'कर्दनकाळ'...???
  पारदर्शक मतदान... 'प्रजासत्ताका'च्या नागरिकांचा मूलभूत हक्क....
  EVM हटवा... लोकशाही वाचवा!

- सत्ताधाऱ्यांसाठी 'EVM' म्हणजे, 'अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा' की, 'हॅरी पॉटरची जादू'?
  ...पुढल्या पिढ्यांना स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेता यावा म्हणून, "स्वातंत्र्याची दुसरी लढाई; EVM हटवा... स्वातंत्र्य वाचवा"!
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION

- देशात 'ईव्हीएम'वर (EVM) सुयोग्यरित्या पार पडलेली 'शेवटची' निवडणूक... ही, २०१४ ची लोकसभा निवडणूक होती!
  जसजसा २०१४ नंतर 'निवडणूक आयोग' सत्ताधाऱ्यांचा 'बटीक' बनत गेला; तसतशी EVM मध्ये 'हेराफेरी' सुरु झाली... त्यातूनच, जनतेला संशय येऊ नये, अशा पद्धतीने, कुठल्या निवडणुका 'हेराफेरी'तून जिंकायच्या आणि कुठे 'हेराफेरी' टाळायची (त्या बहुतेक ठिकाणी सत्ताधारी पराभूत)... याची, पद्धतशीर गणितं मांडली जायला लागली...!!!
  EVM हटवा... लोकशाही वाचवा!
  NO BALLOT-PAPER... NO ELECTION

- "सरकार, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय...यांनी मिळून, देशातील मतदारांची 'माकडचेष्टा' चालवलीय काय?"
  'मारकडवाडी' Mock-Election वरील पोलिसी-दडपशाहीचा निषेध!

- आपली 'लोकशाही' ही मतपत्रिकेद्वारा पारदर्शक 'व्होटिंगशाही' नसून; एतच द्वारा मतांचा 'झोल' करणारी 'झोटिंगशाही' आहे!
  NO BALLOT-PAPER...
  NO ELECTION
  प्रजासत्ताकाचा 'अमृतकाळ'...EVM त्याचा 'कर्दनकाळ'

- अपघात जेट विमानाला होतात...बैलगाडीला नव्हे! मतदानाचा 'घटनादत्त' हक्क एवढा पवित्र की, आम्ही एकवेळ मंदगती बैलगाडीकडे वळू; पण, वेगवान जेट-विमानाचा धोका पत्करणार नाही!
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION
  EVM हटाओ...गणतंत्र बचाओ!

- एका धोब्याने शंका घेताच, रामाने प्राणप्रिय सीतेचा त्याग केला; मात्र, करोडो लोकं 'EVM'बाबत साशंक असताना तथाकथित 'रामभक्त'...आपल्या लाडक्या 'EVM'ला सोडायला तयार नसावेत?
  EVM हटाओ...लोकतंत्र बचाओ!
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION

- झटपट निकालाची 'भीक' नको; पण, EVMचं 'कुत्रं' आवर!
  बॅलट-पेपर घोटाळ्यांचं नुकसान तुलनेनं खूपच कमी... CCTV-मोबाईलच्या तंत्रज्ञान-युगात, ते घडणंही मुश्किलच!
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION
  EVM हटाओ...लोकतंत्र बचाओ!

- 'EVM' निकालामुळे, जे एकतर संसद/ विधिमंडळात विरोधी बाकांवर किंवा तुरुंगात दिसायला हवेत...ते थेट सत्तेच्या खुर्चीत दिसतात!
  EVM हटवा...लोकशाही वाचवा

  सगळे देश पारदर्शक मतदानासाठी 'बॅलेट-पेपर' वापरत असताना आपण 'EVM'वर द्यूत खेळायचं? लोकशाहीरुपी 'द्रौपदी' पणाला लावायची??
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION

  ---------------------

  मतदान-प्रक्रियेचं 'EVM'कृत 'संगणकीकरण'...म्हणजे, लोकशाहीचं 'वस्त्रहरण'!
  EVM हटवा...लोकशाही वाचवा!

  'EVM'मधून मतांची चोरी करत 'लोकशाही'रुपी सीतेचं अपहरण करणारे...'रामभक्त' की, 'रावणभक्त'?
  EVM हटाओ...लोकतंत्र बचाओ!
  NO BALLOT-PAPER...NO ELECTION

  ---------------------

  स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेता यावा म्हणून, स्वातंत्र्याची दुसरी लढाई EVM हटवा...'स्वातंत्र्य' वाचवा!






# दिल्लीश्वर आणि गुजराथी लॉबीला धडका देण्यासाठी, 'ईव्हीएम' अरबी समुद्रात फेकून द्या! - राजन राजे

## मतपत्रिकेद्वारे निवडणुकीसाठी 'धर्मराज्य पक्ष' आक्रमक...




**१९४७पूर्वी आपण स्वातंत्र्याची पहिली लढाई लढलो, आता मिळालेलं स्वातंत्र्य आपल्याला वाचवायचे असेल तर, मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यावाचून आपल्याला गत्यंतर नाही. त्यानंतर, भाजपाला अगदी दोन तृतीयांश जरी मतं मिळाली तरी, आमची हरकत नाही; मात्र, अशी बनावटगिरी आणि भोंदुगिरी आम्ही यापुढे खपवून घेणार नाही. आमच्या जनमताचा अनादर चालवून न घेण्यासाठीच 'धर्मराज्य पक्षा'ने नो ''बॅलेट पेपर... नो इलेक्शन'' या घोषणेखाली, स्वातंत्र्याची दुसरी लढाई सुरु केली असल्याचे उद्गार पक्षाध्यक्ष राजन राजे यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना काढले. आगामी सर्व प्रकारच्या निवडणुका यापुढे 'ईव्हीएम'ऐवजी मतपत्रिकेद्वारे घेण्यात याव्यात यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने जनजागृती मोहीम सुरु करण्यात आली असून, ठाणे शहराच्या विविध भागात राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली ही मोहीम राबविण्यात येणार असल्याचे राजे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.** दरम्यान पत्रकार परिषदेनंतर, लगेचच ठाणे रेल्वे स्थानक परिसरात घेण्यात आलेल्या जनजागृती मोहिमेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या जनजागृती मोहिमेअंतर्गत, पक्षाच्या वतीने मतपेटी तयार करण्यात आली असून, त्यात नागरिकांकडून आपले मत कोणाला... ईव्हीएम की, मतपत्रिकेला? यासाठी प्रतीकात्मक मतदान घेण्यात आले. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालात, भाजपा-महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. जर, त्यांचा विजय इतकाच ''न भूतो'' व ऐतिहासिक होता; तर, त्यांच्या तथाकथित कार्यकर्त्यांखेरीज, रस्तोरस्ती सर्वसामान्य जनतेचा उत्स्फूर्त आनंदोत्सव का दिसला नाही? असा परखड सवाल उपस्थित करुन, ही तर सर्वसामान्य जनतेच्या मतांची थेट चोरी असून, आपली फसवणूक होतेय आणि हीच फसवणूक भविष्यात पुन्हा होऊ द्यायची नसेल तर, दिलीश्वरांना आणि गुजराथी लॉबीला धडका देण्यासाठी ईव्हीएम मशीन अरबी समुद्रात फेकून देण्याशिवाय गत्यंतर नसल्याचा जोरदार घणाघात राजन राजे यांनी पत्रकार परिषदेत केला.

दरम्यान, **'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यावेळी पत्रकारांशी बोलताना पुढे म्हणाले की, यासंदर्भात आम्ही विविध राजकीय पक्षांच्या बड्या नेत्यांना भेटून, ही संकल्पना त्यांच्या गळी उतरवणार आहोत. ज्यांना पटेल ते आमच्यासोबत येतील, न पेक्षा आम्ही ''एकला चालो रे'' याप्रमाणे, भारतीय स्वातंत्र्याच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने जपणूक करण्यासाठी अधिक आक्रमकपणे 'ईव्हीएम'ला प्राणपणाने विरोध करु. ''नो बॅलेट पेपर... नो इलेक्शन'' ही आमची घोषणा असून, मतपत्रिकेवरील मतदानाचा हक्क पुन्हा मिळवण्यासाठी, येत्या २६ जानेवारी-२०२५ रोजी, प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, रात्री ठीक ९ वाजता, फक्त पाच मिनिटांसाठी सर्वांनी आपल्या घरातले अथवा कार्यालयातले लाईट्स बंद ठेवून, 'ईव्हीएम'वरील मतदानाचा तीव्र निषेध व्यक्त करण्याचे आवाहनदेखील राजन राजे यांनी यावेळी केले.** निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय, देशातील नागरिकांची अत्यंत लाजिरवाणी व क्रूर चेष्टा करतायेत. दिलेली मतं 'ईव्हीएम'मध्ये दिसत नव्हती म्हणून, 'व्हीव्हीपॅट' आणलं; परंतु, मतं मोजली कुठली? तर, 'ईव्हीएम'मध्ये न दिसणारी. मतपत्रिका मोजणे हे, एव्हरेस्ट शिखर चढण्याएवढे किंवा एखादा भलामोठा डोंगर खोदण्याएवढे अवघड काम आहे का? असा थेट प्रश्नदेखील राजन राजे यांनी यावेळी उपस्थित केला. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय हे, राज्यघटनेचे रक्षक असताना, ही न्यायपीठे मात्र, सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालची मांजरं झालीयेत, अशी जोरदार टीकादेखील 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी शेवटी पत्रकार परिषदेत केली.

# आम्ही उरलो आता बाबासाहेबांची जयंती-मयंती साजरी करण्यापुरते, आरक्षणाची आरती ओवाळण्यापुरते....

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी थेट 'साम्यवादा'चा, जसा कार्ल मार्क्सने सांगितला तसा, परिपूर्ण स्विकार केला नसला; तरीही, 'समतेच्या संदेशा'चा प्रवासही, कुठेतरी त्या साम्यवादी-समाजवादी सडकेवरुनच दौडत होणार, हे त्यांच्यासारख्या प्रज्ञावानाला ठाऊक असणारच. त्यादृष्टीनेच, डम स्मिथचे ''मुक्त बाजारपेठीय तत्त्वज्ञान, हे 'अस्पर्श' राखण्याएवढं 'अंतिम-सत्य' वा अतिपवित्र असणं... किंवा, माणूस हे वासनांचं गाठोडं असल्याने प्रत्येक माणूस, हा अविरत आपापला स्वार्थ जपणारा तर्कशुद्ध प्राणी (Homo Economicus) आहे वगैरे'' भांडवली-व्यवस्थेचं कडवं समर्थन करणारं अत्यंत कठोर, माणुसकीशून्य प्रतिपादन बाबासाहेबांना निश्चितच त्याज्य वाटलं असावं. कारण, याच प्रतिपादनाने, मुक्त-बाजारपेठीय अर्थव्यवस्थेच्या (Neo-Liberal) ''भांडवली-हव्यास हा चांगला असतो (Greed is Good), स्वार्थीवृत्तीमुळे समृद्धी येते आणि वाढणारी 'आर्थिक-विषमता' ही कार्यक्षमतेची पोचपावती असते (Widening Inequality is Efficient)'', या अमानुष-घृणास्पद मांडणीला व जडणघडणीला बळकट पाया प्राप्त करुन दिला होता.

...म्हणूनच, त्यांना **जागतिक महामंदीनंतरच्या कठोर कालखंडात प्रख्यात ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स याने केलेली (समतेच्या संदेशाशी रुजवात करणारी) मांडणी बऱ्याच अंशी भावली असावी. केन्सने, भांडवलदारांच्या 'भांडवली-व्यवस्थे'शी असलेल्या एका अलिखित 'सामाजिक-करारा'चा संदर्भ देऊन, ठामपणे प्रतिपादन केलं होतं की, ''भांडवलदारवर्गाला भांडवलशाहीत अधिकची संपत्ती अर्जित करण्याचं, स्वातंत्र्य यासाठीच बहाल केलं गेलेलं असतं की, त्यांनी जास्तीतजास्त नफ्याची गुंतवणूक करुन, त्यातून पुरेसे रोजगार निर्माण करण्याचं अभिवचन पाळलंच पाहिजे...तसेच, अनियंत्रित भाववाढीतून कामगार-कर्मचारीवर्गाच्या वेतनमानाची 'क्रयशक्ति' घटू न देण्याचंही बंधन, त्यांनी पाळलं पाहिजे!''**

...याचाच अर्थ, सामाजिक-संरचनेतील 'समतावादी' घुसळणीसोबतच...आर्थिक संसाधनांची असमान अथवा विषम वाटणी रोखली जाणं, त्यांचं न्याय्य वाटप होणं...हे बाबासाहेबांना त्यांच्या 'समतेच्या संदेशा'त प्रामुख्याने अभिप्रेत होतच.

एकप्रकारे, भांडवलदारवर्गाने राष्ट्रीय-संपत्तीचे 'विश्वस्त' म्हणून रहावे, हीच भूमिका 'केनेशियन-मांडणी'त अध्याहृत होती...ज्याचा, सरळसोट संबंध राष्ट्रपिता म. गांधींच्या सामाजिक-आर्थिक स्वरुपाच्या (Socio-Economic) 'विश्वस्त-संकल्पने'शी (Trusteeship) व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'समतेच्या संदेशा'शी तंतोतंत जुळणारा होता!

**आजमितीस देशात बेलगाम 'खाजगीकरणा'चं व मोजक्या शे-दिडशे भांडवलदारांच्या हातात नैसर्गिक-संसाधनांची श्रमिकवर्गाच्या रक्ताघामाची लूट करण्यासाठी संपूर्ण देश सोपवण्याचं...भाजपाई-संघीय षडयंत्र धडाक्यात राबवलं जातंय आणि शरमेची बाब ही की, त्याला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साथ देणारे अनेक 'हात', हे दलित समाजातील प्रस्थापित नेतमंडळींचे आणि अधिकारीवर्गाचेच आहेत... आणि, ते केवळ दलित समाजाचंच नव्हे; तर, भारतातील संपूर्ण श्रमिकवर्गाचं दुर्दैव होय. त्यामुळेच, पं. नेहरु, इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्यापश्चात सहासात दशके घालून दिलेल्या 'समाजवादा'च्या तंबूत, 'भाजप-संघ'प्रणित उन्मत्त 'भांडवली-व्यवस्थे'चा उंट शिरलाय... तो सर्वश्रमिकांनी संघटित होऊन कौशल्याने बाहेर काढल्याखेरीज अवरुद्ध झालेला, बाबासाहेबांच्या 'समतेच्या संदेशा'चा प्रवाह पुन्हा खळाळत वाहणे नाहीच!**

आजमितीस जगभरात अमेरिका, नॉर्डिक देश, जपान, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, इटली, स्पेनसह अगदी सरसकट सगळ्याच भांडवलप्रधान प्रगत देशांमधे डम स्मिथप्रणित भांडवली-व्यवस्था जशीच्या तशी कुठेही अस्तित्वात नाही...ज्या काही अर्थव्यवस्था आहेत; त्या 'संमिश्र' म्हणजेच, भांडवलशाही आणि समाजवादाची स्थलकालसापेक्ष सांगड घालणाऱ्या आहेत. हीच अचूक व अमोघ दूरदृष्टी पं. नेहरुंनी स्वातंत्र्यापश्चात आपल्या देशात दाखवली होती व ती बाबासाहेबांनाही बव्हंशी मान्य होती, हे विशेष. म्हणूनच तर, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उण्यापुऱ्या तीनचार वर्षातच 'समानते'च्या तत्त्वाआड येणारे जमिनदारी-निर्मूलन करण्यातील घटनात्मक अडथळे दूर करण्यासाठी घटनादुरुस्तीचा कार्यक्रम राबवणं सुरु झालं. त्यातूनच पुढे 'कल्याणकारी-राज्य संकल्पने'ला (Welfare-State) आपल्या देशात मोठी चालना मिळणार होती.

आपल्याला सिंगापुरच्या 'मुक्त-व्यापार व्यवस्था' (Free Trade Policy); तसेच, परकीय गुंतवणूकदारांना मोकळं रान देण्याबाबतच्या सिंगापूर-प्रारुपाबद्दलच (Singaporean Model) कायम सांगितलं जातं; पण, कुठलीही भांडवली मुखपत्रे-माध्यमे, तुम्हाला हे कधिही सांगणार नाहीत की, तेथील ९०% जमीन सरकारच्या ताब्यात असते, ८५% घरांची मालकी...सरकारी 'महामंडळा'कडे असते व ती घरे 'वाजवी भाड्या'ने नागरिकांना तहहयात रहायला दिली जातात; तसेच 'सिंगापूर एअरलाईन्स'सकट २५% हून अधिक नैसर्गिक सेवा-संसाधनांवर मालकी सरकारचीच असते!

...मात्र, आपल्या शहरं-उपनगरांमधून राजकारण्यांचा 'वरदहस्त' लाभलेली किंवा त्यांच्याशी उघड वा छुपी भागिदारी करुन बसलेली 'बिल्डर-लॉबी', रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'व्यवस्थेशी (Vampire-State System) गुन्हेगारी हातमिळवणी करुन... शहरं-उपनगरांमधील रहात्या घरांची (फ्लॅट्स) किंमतच जर पगाराच्या 'शेकडो पटी'त राखत असेल (तुटपुंज्या पगाराच्या कंत्राटी-कामगारांच्या पगाराच्या तर, हजार पटीत); तर, ''शहर हे 'जहर' बनून शहरी जगणं, हे गळ्यातलं असह्य लोढणं बनणारच...घरातल्या 'लक्ष्मी'ला नाईलाजास्तव उंबरठा ओलांडून स्वतःला नोकरीच्या पिळवणूक-चक्रात झोकून द्यावं लागणारचं!''

...बिल्डर, हा अवांछित वा अनावश्यक घटक, हाच एक आपल्या सर्वांचं भयंकर शोषण करणारा समान 'समाजशत्रू' आहे आणि आता तर ही मंडळी उजळ माथ्याने मंत्रिमंडळातही मिरवायला लागलीत; कारण, 'मतदार' म्हणून आपणच त्याला कारणीभूत आहोत!

तसेच, कॉर्पोरेटीय क्षेत्रात 'किमान-वेतन' (कामगार-कर्मचारीवर्गापैकी प्यून, हेल्पर वगैरे तळागाळातील शोषित मंडळी, जी हल्ली बहुशः 'कंत्राटी-गुलाम' बनवलेली असतात) आणि MD/CEO वगैरेंचं 'कमाल' अथवा 'जास्तीतजास्त वेतन' (सगळे भत्ते-सेवासुविधा मिळून) यांचं गुणोत्तर १ : १२ पेक्षा जास्त असता कामा नये...याचाच अर्थ, कंपन्या-कारखान्यांमधून प्यून-हेल्परच्या वेतनाच्या १२ पटीपेक्षा जास्त वेतन, कुठल्याही अधिकाऱ्याला मिळताच कामा नये.

तरच, आपापसातच गुन्हेगारी संगनमत करुन संपत्तीचा वाटे जिरवत जाण्याचे आणि खालच्या स्तरावरील कामगार-कर्मचारीवर्गाला वंचित ठेवण्याचे मार्ग आपसूकच बंद होत जातील... बाबासाहेबांचा 'समतेचा संदेश' पोथ्यापुस्तकात बंदिस्त न रहाता; प्रत्यक्ष व्यवहारात उतरेल... मगच कामगारवर्गाला, शेतमजुरांना जीवघेणे व संसार उध्वस्त करणारे संघर्ष करावे लागणार नाहीत! आणि, त्यानंतरच, कंपन्या-कारखान्यांमधून श्रमिकांना शिस्तबद्ध राखण्याकामी कडक नियमावली करा व त्यांची खुशाल कठोर अंमलबजावणी करा.

...आणि, हे करण्याची रक्तपिपासू-निर्दयी-शोषक व्यवस्थेची (Vampire-State System) तयारी नसेल; तर, ती 'व्यवस्था' बदला...नीतिमान व्हा, संवेदनशील व्हा, जागते व्हा आणि प्रस्थापित राज्यकर्ते-राजकीय पक्ष बदला...नव्या 'व्यवस्था-बदला'ला सामोरे जाण्याची हिंमत, आजच्या महापरिनिर्वाण-दिनाच्या निमित्ताने दाखवूया!

**...आज बाबासाहेब असते, तर कंत्राटी-कामगार पद्धत, आऊटसोर्सिंग, NEEM आणि त्यातून आजमितीस उद्भवलेल्या महाभयानक व अमानुष स्वरुपाच्या 'आर्थिक-विषमते'वर त्यांनी कोरडे ओढले असते...कंत्राटी-शेती पद्धतीवर तुटून पडले असते. पण, 'बाबासाहेब' आपल्यातून निघून गेले आणि त्यांच्या पुण्याईवर जगणारे राजकारणी 'दुकानदारसाहेब' मात्र, मागे शिल्लक राहिलेत, हे आपलं मोठं दुर्दैवच!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# देवकीनंदन गोपाला!

बाबा
तुझं खानदान धोब्याचं.
धोब्यानं भल्या घरची धुणी धुवावी
चार घरच्या भाकऱ्या गोळा कराव्या
ढेबूजी जानोरकर वट्ठी म्हणून नाव कमवावं
बायकापोरांचं पोट भरावं.....
आणि खाऊन पिऊन सुखी रहावं!
पण तुला काय अवदसा आठवली कोण जाणे?
अंगावर रंगीबेरंगी चिंध्या अंथरल्यास
धोतर सोडून जुनेर नेसलास
एका कानात कवडी
दुसर्या कानात बांगडी
डोक्यावर खापराचा तुकडा ठेवून
हातात काठी घेऊन
नांदत्या घरातून बाहेर पडलास
आणि.....
नकळत मला सर्वस्वाचे त्याग करणाऱ्या
बुध्दांची आठवण देऊन गेलास!
म्हातारी आई, तीन महिन्याची गर्भार बायको
दोन चिमुरड्या लेकी
काही काही पाहिलं नाहीस तू
एका क्षणात या साऱ्यांकडे पाठ फिरवलीस
एक मुक्तात्मा
पिंजरा तोडून मुक्त संचारासाठी निघाला.

लोकांच्या लाथा खाऊन
त्यांना बाता शिकवणारा
एकमेव अवलीया तू
गंगा बहती भले
साधू चलते भला
अगदी तसाच तू चालत राहिलास
वार्यासारखा रात्रदिवस वाहत राहिलास
टक्के टोणपे खात राहिलास
भजन किर्तन गात राहिलास
हातात खराटा घेऊन
अक्षरशः पन्नास वर्षे
इथले रस्ते झाडत राहिलास
आणि......
शुभ्र पंचा नेसणाऱ्या महात्म्यांनाही
हातात झाडू धरायला लावलास
नाहीतरी जातीवंत धोबीच होतास ना तू.

सकाळी गावातली घाण साफ करुन
संध्याकाळी डोक्यातली घाण साफ केलीस
अन्.....
भविष्यातल्या कित्येक शाम मानवांना प्रेरणा देऊन गेलास
आयुष्यभर भाकरीचा शिळा तुकडा खाऊन
खापरामध्ये पाणी प्यायलास
लुळ्या पांगळ्यांना कडेवर घेतलेस
महारोग्यांना स्वतःच्या हाताने
चांगलं चोळून मोळून न्हाऊ माखू घातलेस
अन्
कित्येक बाबा आमट्यांना
जगण्याचा उद्देश प्राप्त करुन दिलास.
कुठलाही चमत्कार न करता
स्वतःच एक चालता बोलता चमत्कार झालास.

तुझं कीर्तन ऐकून आचार्य अत्रेसारख्या
शब्दप्रभूंनी सुध्दा तोंडात बोट घालावे
प्रबोधनकारासारख्या तर्कतीर्थाने सुध्दा तुझ्यासमोर
नतमस्तक व्हावे
धर्मांतराच्या बाबतीत
संविधानकाराने सुध्दा
तुझा शब्द प्रमाण मानावा?
खरंच, इतका का तू महान होतास?

खरंच बाबा
आज तू हवा होतास.
ताडकन उठला असतास
आणि अयोध्येला जाऊन कारसेवकांपुढे भजनाचा
गजर सुरु केला असतास
प्रश्नांची झड सुरु झाली असती
कारसेवा झाली का?
झाली बाबा
मंदिरातले राम दिसला आणि रस्त्यावरचा दिसला का?
नाही बाबा
अरे, असे कसे आंधळे झाले तुमी?
एवढ्या लांबून तुमी रामाचे मंदिर बांधायले
एयर कंडिशन रथयात्रा घेऊन आले
आणि तुम्हाले तुमचे दारात उभे राहिलेले
राम दिसले नही?
दारात उभे राहिलेले राम ठनाना करते
खपाटी गेलेले पोट हातापायाच्या काड्या
त्येला भूक लागलेलेली असते
ते भाकरीसाठी गयावया करते
त्याले हाकलून देता आणि खुशाल येथे रामाचे
मंदिर बांधायले येता
भल्ले लब्बाड गडी तुम्ही
राममंदिर इथे नाही बाप्पा
ते तर नवकोटी
दीन दलित जनतेच्या हृदयात आहे.
जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जे आपुले
तुका म्हणे सांगू किती तेची भगवंताची मुर्ती!
भुकेल्याले अन्न द्या
तान्हेल्याले पाणी द्या
यापरते दुसरे पुन्य नही
उपास तापास कराल, पुन्य नही
तासंतास देवाची पुजा कराल, पुन्य नही
कारसेवा कराल, पुन्य नही
बाबरी मशीद तोडाल, पुन्य नही
राम मंदिर बांधाल, पुन्य नही
तुका म्हणे जन्म गेला
शिला वाहता वाहता मेला
असं म्हणून
तू जोरजोरात टाळ्या वाजविल्या असत्यास
बेभान होऊन नाचला असतास
आणि मग तू तुझ्या आवडीचं भजन बोलला असतास.....,
गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला!
...विवेक मोरे
(गाडगेबाबांच्या क्रांतीकारी स्मृतीस विनम्र अभिवादन!)



## भला जमीनदार!

गावचा जमीनदार मेला, त्या दिवशी
एक जाणता म्हणाला,
ठाकूर भला माणूस होता.
अडल्यानडल्याला मदत करत होता.
कधीच कोणाला शिवी देत नव्हता.
आमच्या कर्जाची थकबाकीदेखील
मऊ आवाजात मागत होता.

जप्ती आणताना त्याच्या डोळ्यात
अश्रू असत
आणि मुनीमाच्या डोळ्यात मग्रुरी.

त्याने बायाबापड्यांकडे वाईट नजरेने
पाहीले नाही.
दारु, जुगार, मांसाहार त्याने कधी
केला नाही!

त्यावर लाल बावट्याचे वारे
लागलेला उद्धट पोर म्हणाला,
कुळे अडतनडत का होती?
ती कर्जे काढत का होती?
त्यांची दिवाळखोरी का होती?
घरावर जप्ती का येत होती?
मुनीमजीची मग्रुरी कोणासाठी
होती?

जाणता म्हणाला,
तुम्ही आजकालची पोरं उद्धट
आहात.
बेअक्कल, अविचारी, कृतघ्न आहात.
त्यानेच आपल्याला जगवले हे
डोळ्याआड करत आहात.
दुष्काळात गाव उपाशी पडला नाही,
हे विसरत आहात.

थोडे थांबून जाणता पुढे म्हणाला,
गाव चालवायचा म्हणजे कठोर
निर्णय घ्यावेच लागतात.
ठाकूराकडे याशिवाय दुसरे काय
पर्याय असतात?

त्यावर लाल बावटेवाला हसला
आणि एवढेच म्हणाला,
आबा, तुम्ही जमीनदाराच्या पोराला
घाबरता आहात!
.......
**डॉ. रुपेश पाटकर**
(टीप: याचा मनमोहनसिंगांच्या
धोरणांशी संबंध लावू नये!)

# घ्या समजून राजे हो...

## महाराष्ट्रातील फडणवीस सरकारने घटनेची पायमल्ली करणे टाळावे.

**महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका आटोपल्या आणि निकालाही लागले. त्यानंतर नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेतली. त्यांचे मंत्रिमंडळही गठित झाले. खातेवाटपही पूर्ण झाले. आता लवकरच पालकमंत्रीही ठरतील. त्यानंतर कदाचित महामंडळे आणि समित्यांवर नेमणुकांचे गुऱ्हाळ सुरू होईल. याच दरम्यान कधीतरी विधान परिषदेच्या राज्यपाल नामनिर्देशित १२ सदस्यांपैकी ५ सदस्यांच्या निवडणुकांचा प्रश्नदेखील राजकीय वर्तुळात ऐरणीवर येणार आहे.**

आपल्या देशात सांसदीय लोकशाहीपद्धती स्वीकृत झाली. त्यावेळी घटनेत ब्रिटनच्या धर्तीवर दोन सभागृहे निश्चित करण्यात आली. त्यातील एक देशभरातील सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे सभागृह म्हणजेच लोकसभा हे असेल, तर एक मान्यवरांचे सभागृह हे राज्यसभा म्हणून ओळखले जाईल, असे निश्चित केले गेले. राज्यसभेत राज्यातील विधानसभांतून निवडून दिलेले सदस्य हे खासदार म्हणून राहतील, आणि त्याचबरोबर राष्ट्रपतींनी नामनिर्देशित केलेले सदस्यही खासदार म्हणून राहतील असे निश्चित करण्यात आले होते. राष्ट्रपतींनी हे सदस्य कसे नामनिर्देशित करावे याबाबत घटनेत स्पष्ट निर्देश दिले असून घटनेच्या १७१/ ३इ आणि १७१/५ या कलमांमध्ये ते स्पष्ट करण्यात आले आहे.

ज्याप्रमाणे राज्यसभेत राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे त्याचप्रमाणे राज्यांमध्ये जिथे विधान परिषदा आहेत तिथे विधान परिषदेतही राज्यपाल नामनिर्देशित सदस्य नेमणूक करण्याची तरतूद घटनेत आहे.

राष्ट्रपती किंवा राज्यपालांनी असे नामनिर्देशित सदस्य नेमण्याची घटनेत तरतूद करण्यात आली. त्यामागेही काही निश्चित कारणे आहेत. समाजातील ज्या मान्यवर व्यक्तींचे राज्यकारभार सुचारू रूपाने चालवण्यासाठी मार्गदर्शन अपेक्षित आहे मात्र ज्या व्यक्ती राजकारणात येऊ इच्छित नाहीत आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरून निवडणूक लढवण्यास इच्छुक नाहीत किंवा निवडणूक लढली तरी निवडून येणार नाहीत अशा विविध विषयातील किंवा क्षेत्रातील तज्ञ, जाणकार, अनुभवी, अभ्यासू व्यक्तींना इथे नेमावे असे घटनाकारांना अभिप्रेत होते. घटनेच्या १७१/५ या कलमात या व्यक्ती कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा आणि सहकार या क्षेत्रातील असाव्यात असे नमूद करण्यात आले होते. या नेमणूका ६ वर्षांसाठी असतात आणि या सदस्यांना इतर लोकप्रतिनिधींना असतात ते सर्व अधिकार मिळत असतात.

देशात सर्वच राज्यांमध्ये विधानसभा आहेत आणि काही मोजक्याच राज्यांमध्ये विधानपरिषदाही अस्तित्वात आलेल्या आहेत. त्यात महाराष्ट्रही एक आहे. महाराष्ट्रात स्थापनेपासूनच विधान परिषद अस्तित्वात आहे. महाराष्ट्राचे गठन होण्यापूर्वी महाराष्ट्रात जुना मुंबई प्रांत आणि सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार या राज्यातील भाग जोडण्यात आले होते. त्या दोन्ही राज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात होती. त्यामुळेच महाराष्ट्रातही विधानपरिषद गठीत करण्यात आली असावी असा निष्कर्ष काढता येतो.

महाराष्ट्राच्या गठनापासूनचा इतिहास तपासला तर, महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १२ सदस्य नामनिर्देशित केले जातात. मे १९६० पासून तर, जून २०१४पर्यंत या विधान परिषदेत एकूण ११८ सदस्य नामनिर्देशित करण्यात आले. त्यातील १२ सदस्य वगळता बहुतेक सर्व सदस्य हे घटनेत नमूद केलेल्या निकषांमध्ये बसणारे नव्हते; तर, केवळ राजकीय तडजोड म्हणून राजकीय व्यक्तींचीच नियुक्ती सदस्य म्हणून करण्यात आली होती असे आढळून आले. त्यातही सत्ताधारी पक्षाचे जे कार्यकर्ते निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्यामुळे नाराज आहेत किंवा ज्यांना उमेदवारी मिळाली पण ते पराभूत झाले आणि पक्षाच्या दृष्टीने ते विधिमंडळाच्या कोणत्यातरी सभागृहात राहणे गरजेचे आहे अशाच व्यक्तींना ओढून ताणून घटनेतील निकषांमध्ये बसवून नियुक्त करण्यात आले होते. घटनेत दिलेल्या मी कशामध्ये बसणाऱ्या बारा व्यक्तींपैकी काही प्रमुख नावे गीतकार ग. दि. माडगूळकर, संगीतकार वसंत देसाई, साहित्यिक सरोजिनी बाबर, शिक्षण तज्ञ डॉ. रफिक झकेरिया, पत्रकार मा.गो. वैद्य, लेखक अनंत गाडगीळ, सामाजिक कार्यकर्त्या निर्मला ठोकळ, कवी शांताराम नांदगावकर, साहित्यिक लक्ष्मण गायकवाड, अशी सांगता येतील.

हे बघता १९६० पासून तर २०१४ पर्यंत महाराष्ट्रातील काँग्रेस किंवा शिवसेना-भाजप सरकारने घटनेची पायमल्लीच केली आहे असे दिसून येते. २०१४ मध्ये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची मुदत जून २०२० मध्ये संपली. त्यावेळी सत्तेत असलेल्या शिवसेना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महाविकास आघाडी सरकारने नोव्हेंबर २०२० मध्ये जी १२ नावे पाठवली तीदेखील सर्व राजकीय नावेच असल्याचे बोलले गेले. राज्यमंत्री राज्यामध्ये सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी राज्यपाल हे केंद्रात सत्तारूढ असलेल्या सरकारने नेमलेले असतात. हे राज्यपाल केंद्र सरकार आणि राष्ट्रपतींना उत्तरदायी असतात. प्रथा परंपरेनुसार राज्यपालांनी नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची नावे निवडून राज्य मंत्रिमंडळ राज्यपालांकडे शिफारस करते आणि ती नावे घटनेच्या चौकटीत बसणारी आहेत का हे तपासून राज्यपाल त्यांची नियुक्ती करतात. जिथे केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असते तिथे राजकीय तडजोडीतून पाठविलेली नावेही मंजूर केली जातात. मात्र राज्यात वेगळ्या पक्षाचे सरकार आणि केंद्रात वेगळ्या पक्षाचे सरकार असले तर, तिथे राज्यपाल हमखास घटनेच्या चौकटीत बसणारी नसलेली नावे अडवू शकतात. नोव्हेंबर २०२० मध्ये महाराष्ट्रात नेमके तेच झाले. केंद्रात भाजपाचे सरकार असल्यामुळे महाराष्ट्रातील राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांनी तब्बल २ वर्ष राज्य सरकारने पाठविलेल्या १२ नावाचा प्रस्ताव प्रलंबित ठेवला. मिळालेल्या माहितीनुसार या १२ नावांमध्ये सर्व नावे राजकीय तडजोडीतून पाठविलेली होती. परिणामी ती नावे घटनेच्या चौकटीत बसणारी नव्हती. बहुदा याच कारणासाठी राज्यपाल कोशियारी यांनी हा प्रस्ताव प्रलंबित ठेवला असावा. जुलै २०२२ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर झाले. शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांचे संयुक्त सरकार सत्तारूढ झाले. त्यावेळी राज्यपालांनी नोव्हेंबर २०२० मध्ये महाआघाडी सरकारने पाठविलेला १२ नावांचा प्रस्ताव सप्टेंबर २०२२ मध्ये परत पाठवून दिला.

त्यानंतर **ऑक्टोबर २०२४ पर्यंत विधान परिषदेतील या १२ जागा रिक्तच होत्या १४ऑक्टोबर २०२२ रोजी विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होणार होती. त्यादिवशी घाईगडबडीत शिंदे फडणवीस सरकारने १२ पैकी ७ जागांवर नामनिर्देशित सदस्यांची नावे पाठवली. राज्यपाल राधाकृष्णन साहेबांनी घाईगडबडीत ती नावे मंजूर केली आणि लगेचच या सातही सदस्यांचा शपथविधी त्याच दिवशी उरकण्यात आला. त्यानंतर तासाभरातच आचारसंहिता लागू झाली. या ७ नावांमध्ये २ नावे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाशी संबंधित २ नावे शिवसेना शिंदे गटाशी संबंधित तर ३ नावे भारतीय जनता पक्षाशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे. यात चित्रा वाघ, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, विक्रांत पाटील, धर्मगुरू बाबु सिंग महाराज राठोड, हेमंत पाटील आणि डॉ मनिषा कायदे यांचा समावेश आहे. ही सातही नावे घटनेच्या कलम १७१/५ मध्ये दिलेल्या निकषांमध्ये बसणारी नाहीत असा सकृतदर्शनी निष्कर्ष काढता येतो. हे बघता तेव्हाच्या शिंदे फडणवीस सरकारनेही घटनेची पायमल्लीच केली हे स्पष्ट दिसते आहे.**

विधान परिषद किंवा राज्यसभेत नामनिर्देशित सदस्य म्हणून नावाची शिफारस करण्यासाठी सत्ताधारी राजकीय पक्षात मोठ्या आर्थिक रकमांची देवाण-घेवाण होते असे बोलले जाते. नोव्हेंबर २०२० मध्ये महाविकास आघाडीतील ३ पक्षांनी प्रत्येकी ४-४ नावे पाठवली होती. त्यावेळी काँग्रेस पक्षातील नेत्यांनी नावांची शिफारस करतांना संबंधित सदस्यांकडून प्रत्येकी ५ कोटी रुपये घेतल्याची तक्रार सेवा दलातील एका कार्यकर्त्याने राज्यपाल कोशियारी यांच्याकडे लेखी स्वरूपात केली होती. तसेच त्या कार्यकर्त्याने प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना देखील हा आरोप केला होता. त्याचा व्हिडिओ सर्व प्रसारमाध्यमांवर समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला होता.

या प्रकरणांमध्ये वेळोवेळी उच्च न्यायालयामध्ये या नियुक्त्यांना आव्हान देणाऱ्या याचीकाही दाखल झाल्या. मात्र राज्यपाल आणि राष्ट्रपतींनी केलेल्या नियुक्त्यांना सर्वसाधारणपणे न्यायालयात आव्हान देता येत नाही. परिणामी या याचिका फेटाळल्या तरी गेल्या, किंवा प्रलंबित तरी राहिल्या.

...पृष्ठ क्र. १३ वर

# घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाचा 'वादग्रस्त प्रकल्प' रद्द करा!

## 'धर्मराज्य पक्षा'ची प्रशासनाकडे मागणी

**ठाणे (प्रतिनिधी) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील, घोडबंदर रस्त्यावर असणाऱ्या, कापुरबावडी ते गायमुखपर्यंतच्या महामार्गावरील सेवारस्ता (सर्व्हिस रोड) मुख्य रस्त्यात विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतलेला असून, या विलीनीकरणाच्या माध्यमातून सेवारस्ता (सर्व्हिस रोड) आणि मुख्य रस्त्यामधील पदपथ कायमस्वरुपी काढले जाणार आहेत. अशाप्रकारे पदपथ काढून टाकणे म्हणजे, सर्वसामान्य करदात्या पादचाऱ्यांच्या मुलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखे होय. पदपथ हे, नागरिकांना चालण्यासाठी असतात, तेच काढून टाकल्यावर, नागरिकांचे जीवित धोक्यात येऊ शकते.** याच पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. १६/०७/२०२४ रोजी, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव, ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री शंभूराज देसाई, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त आणि ठाणे वाहतूक शाखेचे तत्कालीन उप-आयुक्त विनयकुमार राठोड यांना, पत्रव्यवहार करुन (पत्राचा संदर्भ क्र. धराप/मुमं/मरा/मंमुं/२०२४/५०) नागरिकांच्या वित्तहानी आणि जीवितहानीस कारणीभूत ठरणारा, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाचा वादग्रस्त प्रकल्प रद्द करणेबाबत... अशा आशयाची आग्रही मागणी करण्यात आली होती. याच अनुषंगाने पोलीस आयुक्तालय ठाणे शहर अंतर्गत, कासारवडवली वाहतूक उप-विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र राठोड यांची स्वाक्षरी असलेले, दि. १९/१२/२०२४ रोजीचे पत्र (जावक क्र. पोनि/वा. उपविभाग. कासारवडवली/८८१/२०२४) 'धर्मराज्य पक्षा'स तब्बल पाच महिन्यांनी प्राप्त झाले असून, सदर पत्रात, जितेंद्र राठोड यांनी, कासारवडवली वाहतूक उप-विभागाच्या हद्दीतील सेवारस्त्यावर (सर्व्हिस रोड) पार्क केलेल्या वाहनांवर, वाहतूक विभागाकडून, प्रचलित कायद्यानुसार केलेल्या कारवाईची आकडेवारी नमूद केलेली आहे; मात्र, मुख्य रस्ता आणि सेवारस्ता (सर्व्हिस रोड) यांच्या विलीनीकरणामुळे, पदपथ काढले जाणार असल्याने, अपघातांचा संभाव्य धोका निर्माण होणार आहे, त्याबद्दल वाहतूक विभागाने हात वर केलेले आहेत. महामार्गालगत असलेल्या सेवारस्त्यावर (सर्व्हिस रोड) अनधिकृतपणे वाहने उभी केली जातात, त्यावर वाहतूक विभागाकडून कारवाई होणे हे, क्रमप्राप्त आहे... परंतु, त्याचबरोबर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पदपथ हे अत्यंत महत्त्वपूर्ण असताना, तेच काढले जाणार असतील आणि त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितास धोका उद्भवत असल्यास, ठाणे वाहतूक शाखा आपली जबाबदारी टाळत असल्याचेच, कासारवडवली वाहतूक उप-विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र राठोड यांच्या उत्तरादाखल प्राप्त झालेल्या पत्रातून अधोरेखित झाले आहे. **मुळात, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-१९६६ नुसार, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा यांमधील अंतरे कलम-१५४ नुसार, सेवारस्ता (सर्व्हिस रोड) व महामार्ग एकत्र करणे हे, कायद्याचे उल्लंघन असतानादेखील, खुद्द राज्य शासनाकडून सुरक्षिततेसंबंधीचे नियम पायदळी तुडविले जात आहेत, याचा 'धर्मराज्य पक्षा'ने जाहीर निषेध व्यक्त केला आहे. मध्यंतरीच्या काळात, हा वादग्रस्त प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी घोडबंदरवासियांकडून करण्यात आली होती. असे असतानाही, नागरिकांच्या सुविधेसाठी आणि सुरक्षिततेसाठी असणारे पदपथ विलीनीकरणाच्या नावाखाली तोडले जाणे हे, अत्यंत धोकादायक असून, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाचा 'वादग्रस्त प्रकल्प' तत्काळ रद्द करण्यात यावा, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने प्रशासनाकडे करण्यात आली आहे.**

---

*हिंदू असो, मुसलमान असो, ख्रिश्चन असो, वा असो बौद्ध, शीख, जैन, यहुदी... हे नावाला धर्म आहेत. त्यांचं संरक्षण करावं लागतं आणि त्याकामी, मनुष्यजात आपापसात लढून रक्ताचे पाट वहात रहाते...हा सगळाच तद्दन महामूर्खपणा आहे आणि अखिल मानवी समाज, तो महामूर्खपणा पिढ्यानपिढ्या करत आलाय व न जाणो अजून किती पिढ्या करत रहाणार आहे! ''तुम्हाला वरकरणी तात्पुरती स्वतःच्या मनाची समजूत घालून शांतपणे जगायचं असेल; तर, ईश्वरावर विश्वास ठेवा...पण, जर 'सत्य' जाणून घ्यायचं असेल; तर, ईश्वराच्या अस्तित्वावर, प्रश्न उभे करायला शिका''...नित्शेची ही क्रांतिकारी विचारधारा, तत्कालिन ख्रिस्ती समाजाला मुळापासून प्रचंड हादरे देऊन गेली...विनाशकारी-विध्वंसक 'भांडवलशाही'ला आव्हान देण्यासाठी, आज अशाच वैचारिक-उत्पातांची नितांत गरज आहे.*

*...राजन राजे (भाई)*

*आतून अशांत-अस्वस्थ असलेला माणूस, कधिही धार्मिक असू शकत नाही...ती अशांति, ती अस्वस्थताच जर केवळ माणसाला, आपापल्या धर्मस्थळांकडे खेचून नेत असेल; तर, मग आपली धर्मस्थळं-प्रार्थनास्थळं तरी, किती प्रमाणात खरी धार्मिक असू शकतील? विविध धर्म व त्याचं माजलेलं 'अवडंबर', हे फक्त आता राजकीय, व्यावसायिक व धंदेवाईक अड्डे झालेत! धर्म, म्हणजे खरंतरं केवळ 'संप्रदाय'...संप्रदाय, म्हणजे मार्गावरचा एक टप्पा किंवा नदीतिरावरील विखुरलेले घाट; याचाच अर्थ, 'धार्मिकता' या अंतिम गंतव्य स्थानकावर पोहोचणं सुलभ होण्याची केलेली सोय...हे गंतव्य स्थान कुठलं; तर, आपल्याला 'आत्मसाक्षात्कार' घडणं, स्वतःची ओळख पटणं व खऱ्याअर्थाने धार्मिकता अंतरंगाच्या रंध्रारंध्रातून खेळणं... 'भांडवली-समाज', हा आतून कायमच अशांत-अस्वस्थ असतो!*

*...राजन राजे (भाई)*

## घ्या समजून राजे हो...

...पृष्ठ क्र. १२ वरुन

ज्याप्रमाणे महाराष्ट्रात काँग्रेसच्या राज्यात विधान परिषदेतील नियुक्त्या करताना घटनेतील तत्त्वांना हरताळच फासला गेला होता, त्याचप्रमाणे राज्यसभेत देखील या नियुक्त्या करताना घटनेतील तत्त्वांना हरताळच फासला गेला असे दिसून येते. मात्र, १९९८ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यावर त्यांनी काही नियुक्त्यांमध्ये घटनेतील तत्वे पाळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. २०१४ नंतर सत्तेत आलेल्या मोदी सरकारनेदेखील ही तत्वे प्रमाण मानूनच बऱ्याचशा नियुक्त्या केल्याचे आढळून आले आहे. हेच धोरण फडणवीस यांनीही अवलंबावे अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा आहे.

**आता महाराष्ट्रात पुन्हा एकदा भाजप शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे महायुती सरकार सत्तारूढ झाले आहे. आधी विधानसभा निवडणुका तोंडावर होत्या त्यामुळे घाई गडबडीत ७ राजकीय व्यक्तींना नियुक्ती देण्यात आली हे मान्य करता येईल. मात्र आता सत्तेत आलेल्या फडणवीस शिंदे पवार सरकारने तरी उर्वरित ५ नावे ही गैरजकीय व्यक्तींना त्यातही कला साहित्य विज्ञान या क्षेत्रातील तज्ञ आणि जाणकार व्यक्तींनाच निवडून त्यातील योग्य व्यक्तींना ही संधी द्यावी अशी जनसामान्यांची अपेक्षा आहे. फडणवीस, पवार आणि शिंदे हे तीनही नेते नरेंद्र मोदींना आदर्श मानून कारभार बघतात. त्यामुळे मोदींनी आखून दिलेल्या रस्त्यानेच त्यांनी मार्गक्रमण करणे उचित ठरेल.**

या संदर्भात अमळनेर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा संदर्भ देणे संयुक्तिक वाटते. या भाषणात डॉ. शोभणे यांनी साहित्यिकांना फारशी संधी न दिल्याबद्दल खंत व्यक्त केली होती. अध्यक्षीय भाषण हा साहित्य विश्वाचा हुंकारच असतो त्यामुळे या हुंकाराची दखल तरी राज्यकर्ते घेतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

वाचकहो पटतेय का तुम्हाला हे.....? त्यासाठी आधी समजून तर घ्या राजेहो....!

*....अविनाश पाठक*

# सरतं वर्ष आणि घसरतं भारतीय चलन (रुपया)....

सगळ्याची सोंगं करता येतात...पण, पैशाचं सोंग करता येत नाही, या उक्तिनुसार गैरमार्गाने (नोटबंदी, इलेक्टोरल-बॉण्ड, PM Care फंड; तसेच, EVM घोटाळे वगैरे वगैरे माध्यमातून) कमावलेल्या पाशवी बहुमताच्या बळावर, एकूणएक सरकारी-यंत्रणा व सर्व प्रसारमाध्यमं... आपल्या किंवा आपल्या मित्रपरिवारातल्या अब्जाधीशांच्या (Crony-Capitalists) ताब्यात ठेऊन, भारतीय-अर्थव्यवस्थेची लक्तरं, खोट्या सरकारी-आकडेवारीच्या पडद्याआड कितीही झाकू पाहिली; तरी, 'घसरता रुपया' काही सावरता येत नाही आणि म्हणूनच, तो सत्ताधाऱ्यांचं सगळं भांडं-कुभांडं फोडल्याशिवाय रहातही नाही! ...यापूर्वी अनेकदा 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन भारतीय रुपया, लालकृष्ण अडवाणींच्या वयाशी स्पर्धा करु लागलाय, असं म्हटलं गेलंय...सरतं वर्ष-२०२४, आपला निरोप घेत असताना, त्याचा जळजळीत प्रत्यय आपल्याला येतोय. सध्या अडवाणीही अत्यवस्थ आणि भारतीय रुपयाही त्याच स्थितीत खउण मध्ये दाखल! जैसा भारतीय रुपया गिरता है, वैसे देश की गरिमा भी गिरती जाती है म्हणणारे 'राजकीय-सोंगाडे', त्यामुळेच या मुद्द्यावर आता तोंड लपवून आहेत.

**माकडाच्या हाती कोलित दिलंत तर, माकड आगच लावत सुटणार... तशीच, या देशाची गेल्या दहा वर्षातील दारुण अवस्था झालीय. महिलांवरील वाढते अत्याचार, जळतं मणिपूर, अस्वस्थ मुसलमान, मस्जिदींची खोदाई, मंगळसूत्र काढून घेण्याच्या भंपक अफवा, 'मन की बात'च्या बाजारगप्पा...अशा महिला, मणिपूर, मुसलमान, मस्जिद, मंगळसूत्र, मन की बात या सगळ्या 'म'कारातल्या उद्वेग आणणाऱ्या बाबींच्या तपशीलात फार खोलवर न शिरताच, काही धोरणात्मक महत्त्वपूर्ण बाबींवर मात्र, वर्ष सरत असताना, पुन्हा एकवार बोललं गेलंच पाहिजे...तरच, सावध राहून नव्या वर्षाच्या हाका, आपल्या कानी पडतील.**

नवउदारमतवादी-अर्थशास्त्रीय विचारसरणी (Neo-Liberal Economics) भारतात रुजवून मनमोहनसिंगांनी आणलेल्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (Liberalisation, Privatisation, Globalisation...LPG)...या सर्वसामान्यांसाठी 'LPG' वायूसारखंच विस्फोटक ठरलेल्या 'खाउजा' धोरणातून तळागाळातला माणूस साफ भरडला जाऊ लागला...त्याचं 'जागतिकीकरणा'च्या रेट्यात पूर्णतया 'अगतिकीकरण' होऊ लागलं. कॉर्पोरेटीय क्षेत्रात सर्वत्र ऐच्छिक वा सक्तिची निवृत्ती (VRS cum CRS), OutSourcing मधली व कंत्राटी-कामगार पद्धतीतली गुलामगिरी-अस्पृश्यता, कंपनी-दहशतवाद (Corporate-Terrorism) वगैरे कामगारविरोधी धोरणं, एकच धुमाकूळ घालू लागली. नवउदारमतवादी-विचारसरणीतून 'लाभार्थी' बनलेला साधारण २०-२५% मध्यमवर्ग, जरुर नवश्रीमंतीला पावला; पण, त्याच्या जगण्यातून स्वस्थता व संवेदनशीलता कायमची हद्दपार झाली. पारंपरिकरित्या समाजाला नेतृत्त्व देणारा, हा सुशिक्षित मध्यमवर्ग नवश्रीमंतीची 'झिंग' चढल्याने आत्यंतिक स्वार्थी बनला आणि त्यातून तो आपसूकच प्रचंड असुरक्षित व भयभीत जीणं जगू लागला. त्या अशा जिण्याचे अनेक कंगोरे, पुढे जाऊन टोचणारे काटे बनल्याने... नवश्रीमंत मध्यमवर्ग आपलं मानसिक स्वास्थ्य गमावून बसला व अधिकाधिक दारु, सिगरेट, अंमली पदार्थ यांच्या आहारी गेला...नैराश्यापासून तात्पुरती 'मुक्ति' देणाऱ्या 'nti-Depressant' औषधांचा, आपल्या देशात खप प्रचंड वाढू लागला (गेल्या पाचएक वर्षातच तो दुपटीने वाढलाय).

**भारतात हे अघटित घडण्यापूर्वीच, जगभरात नवउदारमतवादी-विचारसरणीचे अघोरी प्रयोग सुरु झाले होतेच. अमेरिकेचे चाळीसावे अध्यक्ष रोनाल्ड रिगनप्रमाणेच इंग्लंडमध्ये नवउदारमतवादी-**



**विचारसरणीचा बुलडोझर फिरवणाऱ्या व कामगारांच्या युनियन्स वगैरे 'लोकशाही-संस्था' पाशवी बळावर मोडून काढणाऱ्या तत्कालिन पंतप्रधान मार्गारेट थॅचर, तर थेट म्हणून गेल्या होत्या की, समाज नावाची अशी काही चीजच अस्तित्वात नसते...जे काही असतं आणि दिसतं ते, समाज या धारणेखाली दिसणाऱ्या फक्त स्वतंत्र व्यक्ति असतात, बस्स्!** सतत व्यक्ति-स्वातंत्र्याचे गोडवे गाणाया व त्याचं उदोउदो करणाऱ्या नवउदारमतवादी (Neo-Liberal) अर्थशास्त्रातील 'स्वातंत्र्या'चा खरा वा गर्भित अर्थ, बहुजनांशी यथोचित-न्यायोचित व्यवहार टाळून बहुजन-समाजाला गुलाम बनवण्याची मूठभर भांडवलदारांना दिलेली पूर्ण मुभा, हाच होता! पण, तो अर्थ समजण्यासाठी सोव्हिएत युनियनचं पतन होऊन भांडवलशाही समोरचं जगभरातल्या 'साम्यवादा'चं (Communism) आव्हान संपुष्टात येण्याची आपल्याला वाट पहावी लागली. मुठभरांच्या हातात केंद्रित झालेली निर्णय-प्रक्रिया, हे नवउदारमतवादी-विचारसरणीचं व्यवच्छेदक लक्षण असल्याने...अशा भांडवली-व्यवस्थेत होणारे निर्णय, हे आम जनतेला अजिबात बांधील नसलेल्या मोजक्या खाजगी व्यक्तिंकडून होत जातात. फक्त नावापुरतीच 'उदार' असणाऱ्या व नावापुरतीच 'नवी' असणाऱ्या (प्रत्यक्षात, 'डम स्मिथ'च्या आदिम भांडवली-विचारसरणीच्या काळापासून अस्तित्वात असलेली) नवउदारमतवादी-विचारसरणीत (Neo-Liberal) लोकसहभाग असलेल्या शासकीय-यंत्रणा जाणिवपूर्वक कमजोर केल्या जातात. या नवउदारमतवादी-विचारसरणीमध्ये विचारवंतांना व सामाजिक-चळवळ करणाऱ्या प्रभृतींना व प्रवृत्तींना अलगसलग पाडलं जातं, जेणेकरुन लोकं अज्ञानापोटी निष्क्रिय, आज्ञाधारक, उदासीन बनावीत व त्यातून व्यवस्थेला लोकांवर बळजोरी करताना फारसा विरोध होण्याची शक्यताच मावळून जावी.

नुकतेच दिवंगत झालेल्या मनमोहनसिंगांच्या काळात नवउदारमतवादी-अर्थशास्त्रीय विचारसरणीला किमानपक्षी काही 'मानवी-तोंडवळा' तरी होता...पण, आता तो ही राखण्याची आवश्यकता भाजपाई-संघीय सत्ताधाऱ्यांना वाटेनाशी झालीय...म्हणूनच, शेतकऱ्यांसह कामगार-कर्मचारीवर्ग, अन्यायकारक कायद्यांच्या वरवंट्याखाली भरडून काढण्याच्या निरंतर हालचाली सुरुच आहेत. नवउदारमतवादी-विचारसरणीच्या कुप्रभावाने अमेरिकेप्रमाणेच भारतात आर्थिक-विषमता टिपेला पोहचू लागलीय... देशात रक्तपिपासू-निर्दय-शोषक अब्जाधीश (Blood-Billioners) तयार होण्याच्या प्रक्रियेनं 'खाउजा' धोरणापश्चात, गेल्या काही दशकात प्रवेग धारण केलाय आणि त्याचवेळेस, दुसरीकडे अन्नान्न दशेला लागलेले करोडो जीव सन्मानाने 'जगण्या'साठी नव्हे; तर, निव्वळ 'तगण्या'साठी दिवसरात्र तळमळू लागलेत.

**आपल्या प्रजासत्ताकाच्या अमृतकाळात तळागाळातला माणूस फक्त, नावाला 'मतदान' करताना त्याचा 'लोकशाही-हक्क' गाजवताना दिसू लागला... पण, प्रत्यक्षात, एकतर अब्जाधीशांच्या भांडवली-पैशातून त्याची मतं सहजी विकत घेतली जाऊ लागली किंवा EVM मधून 'मॅनेज' होऊ लागली...थोडक्यात, तो लोकशाही-प्रक्रियेतून हळूहळू बाद होऊ लागला.**

....पृष्ठ क्र. १५ वर

# मनमोहन सिंग गेले, आता आठवतात ते मात्र पंतप्रधान मोदी !

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं निधन झालंय. सर्व स्तरातून त्यांच्या आठवणी जागवल्या जात आहेत. पण त्या जागवताना कितीही नको म्हटलं तरी सतत आणखी एका व्यक्तीची आठवण अपरिहार्यपणे येतेच आहे. मनमोहन सिंग यांच्याबद्दल लिहिताना किती तरी गाळलेल्या जागा जाणवतात. त्या जागा मनमोहन सिंग यांनी नव्हे; तर, त्यांच्या नंतर पंतप्रधान पदाची सुत्र हाती घेतलेल्या नरेंद्र मोदी यांनी रिकाम्या ठेवल्या आहेत. भले त्यांचं नाव घेतलं जात नाहीये पण मनमोहन सिंग यांच्या बरोबर त्यांची आठवण येतेच आहे.

मनमोहन सिंग यांच्याबद्दल अनेकांनी लिहिलेलं वाचतो आहे. तीन जानेवारी २०१४ च्या त्यांच्या प्रेस कॉन्फरन्सची आठवण बहुतेक लोकांनी काढली. त्या प्रेस कॉन्फरन्समध्ये त्यांनी शंभरपेक्षा जास्त पत्रकारांच्या सुमारे ६२ प्रश्नांना उत्तरं दिली होती. त्या प्रेस कॉन्फरन्सचा व्हिडिओ म्हणजे भारतीय पंतप्रधानांच्या लोकशाहीवादी असण्याचा सर्वात महत्त्वाचा दस्तावेज आहे. मनमोहन सिंग हे अजिबात न बोलणारे पंतप्रधान म्हणून ओळखले जात असत. असं असलं तरी ते अनेकदा पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरे गेले आहेत. संपादकांना त्यांनी मुलाखती दिल्या आहेत. त्यांनी अनेकदा खुलेपणाने प्रेस कॉन्फरन्सही घेतल्या आहेत. या एका बाबतीत जेवढ्या वेळा आपण मनमोहन सिंग यांची आठवण काढू तेवढ्या वेळा आपल्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींची आठवण येणं अपरिहार्य आहे. दहा वर्षात अशी एकही प्रेस कॉन्फरन्स घेण्याचं धाडस त्यांनी दाखवलं नाही. मनमोहन सिंग यांच्या काळात अत्यंत आक्रमक असलेल्या मीडियाने आता मात्र शेपुट घातलंय. मीडियाचा आवाज सध्या बंद आहे आणि हिंदूराष्ट्राच्या नावाखाली निरनिराळी अभियानं चालवणं एवढं एकच काम मीडियाकडे आहे. पूर्वी मीडिया प्रश्न उपस्थित करणाऱ्यांच्या भूमिकेत होती. आता मात्र मीडिया हेच एक मोठंच्या मोठं प्रश्नचिन्ह आहे.

पंतप्रधान मोदींची इच्छा असेल तर, त्यांनी एखादी प्रेस कॉन्फरन्स घेण्याचं धाडस आता दाखवायला हरकत नाही, कारण आता मुळातच पत्रकार उरलेत कुठे? त्यांनी शंभरच काय अगदी हजारेक पत्रकार बोलवले तरी मनमोहन सिंग यांना भूतकाळात जसे प्रश्न विचारले जात असत तसे प्रश्न आता त्यांना विचारले जाणार नाहीत. इंस्टाग्राम रिलसाठी अशा एखाद्या प्रेस कॉन्फरन्सचा घाट पंतप्रधान मोदींनी घालायला हरकत नाही पण त्यांना त्याची गरज नाही. त्यांच्या कार्यकाळातल्या निवडणुका जशा गूढ होत चालल्या आहेत ते बघता त्यामागे खरंच काही तथ्य असेल, तर त्यांनी प्रेस कॉन्फरन्सची चिंता करण्याचीही गरज नाही. अरे, मनमोहन सिंग यांच्या प्रेस कॉन्फरन्सच्या निमित्तानेही पुन्हा पंतप्रधान मोदींचीच चर्चा जास्त होते आहे की!

सर्वसामान्य भारतीय जनतेला मनमोहन सिंग यांनी माहितीचा अधिकार दिला. हा माहितीचा अधिकार पंतप्रधान मोदींना नेहमी धडकी भरवत राहील. त्यांच्या स्वतःच्या कार्यकाळात असा एखादा जनतेच्या हिताचा, पारदर्शक कायदा येणं शक्य तरी होतं का? उलट सध्या माहितीच्या अधिकाराची काय दुर्दशा झाली हे आपण सगळे पहातोच आहोत. माहितीचा अधिकार पायदळी तुडवत सरकारने इलेक्टोरल बॉण्ड आणले. सुप्रिम कोर्टाने माहितीच्या अधिकाराच्या आधारावरच इलेक्टोरल बाँड्स बेकायदेशीर असल्याचं स्पष्ट केलं. इलेक्टोरल बॉण्ड म्हणजे जनतेच्या डोळ्यात सरळसरळ धुळफेक करुन पैसे मिळवण्याचा प्रकार... त्यामुळे भारताच्या राजकारणात एकमेव गलेलठ्ठ गडगंज राजकीय पक्ष शिल्लक राहिला आणि इतर राजकीय पक्ष भिकेला लागले. त्या पक्षांचे नेते तपास यंत्रणांचा ससेमिरा चुकवण्यासाठी भाजपकडे जायला लागले.

माहितीचा अधिकार हे मनमोहन सिंग यांनी भारतीय जनतेला दिलेलं सर्वात मोठं शस्त्र! त्या शस्त्राचा उपयोग करुन अनेक घोटाळ्यांची पोलखोल झाली. पंतप्रधान मोदी आपल्या जनतेला असं कुठलं शस्त्र कधी देतील का? नागरिकांनी निवडणूक आयोगाकडे दस्तावेज मागायला सुरुवात केली तेव्हा सरकारने चक्क नियम बदलले. जेणेकरुन नागरिकांना अशी मागणीच करता येऊ नये. मनमोहन सिंग यांचं सर्वात मोठं यश म्हणजे ते दहा वर्ष सत्तेत होते तरी त्यांच्या कार्यकाळात सुप्रिम कोर्ट आणि निवडणूक आयोग यांची विश्वासार्हता कधीही कमी झाली नाही. सत्ताबदल अगदी सहज पार पडला. आज मात्र देशात होणारी प्रत्येक लहानमोठी निवडणूक संशयाच्या भोवऱ्यात आहे. सुप्रिम कोर्ट असो की हायकोर्ट, अगदी न्यायाधिशांबद्दलही फार विश्वासाचं वातावरण नाही.

मनमोहन सिंग यांच्या काळात विरोध आणि असहमतीला स्थान होतं. अनेकांनी ते गेल्यावर त्याबाबतच्या आठवणीही जागवल्या आहेत. असं का होतंय? त्यांच्या नंतर आलेल्या सरकारमध्ये असहमत असणं, विरोधात असणं या गोष्टींना अजिबात थारा नाही म्हणून? भारत हा लोकशाहीची जननी आहे असं म्हणणाऱ्या आपल्या विद्यमान पंतप्रधानांबाबत असं लोक म्हणू शकतील का? सध्या असहमती आणि विरोध दर्शवणाऱ्यांना तुरुंगवास पत्करावा लागतो आणि बहुतेकांना साधा जामिनही मिळत नाही. भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात एखाद्या पंतप्रधानाने विरोध आणि असहमतीचा सहज स्विकार केला हे काही विशेष नाही. पण मनमोहन सिंग यांनी आपल्यावर होणारी टीका परतवून लावण्यासाठी इतिहासाची मोडतोड केली नाही. खोटी विधानं इतिहासात घुसडली नाहीत. इतिहास माझ्याप्रती दयाळू असेल एवढीच जुजबी नाराजी... बस्स. मनमोहन सिंग आपला इतिहास स्वतःबरोबर घेऊन गेले आहेत. आता मागे उरलाय तो पंतप्रधान मोदी यांचा इतिहास. तो काय आहे? ते बोलले की त्यांनी केलेली विधानं खरी आहेत की खोटी हे तपासून पहावं लागतं... त्यांच्या विधानांमुळे कुठे तेढ निर्माण होऊन काही विपरित घडणार नाही ना याची काळजी करावी लागते... हा त्यांचा इतिहास! आपण जेवढ्या वेळा मनमोहन सिंग यांच्याबद्दल बोलतोय तेवढ्या वेळा नाव न घेताही आपण पंतप्रधान मोदींबद्दल बोलतोच आहोत...

मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात देशातल्या जनतेला दिल्लीतल्या रायसीना हिल्स पर्यंत प्रवेश होता. निर्भया प्रकरणानंतर सरकारला जाब विचारायला नागरिक इंडिया गेटच्या चारही बाजूंना जमले होते. सरकारविरोधात घोषणा देत होते. पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात नागरिकता कायद्याच्या विरोधात नागरिकांनी दिल्ली गाठली तेव्हा त्यांच्यावर बंदुकांच्या फैरी झडल्या. यापूर्वी असं घडलं नव्हतं. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात बहुदा शेवटचंच जनतेने आपल्याला बोलण्याचा, एकत्र येण्याचा, विरोध करण्याचा आणि तरीही सुखरुप घरी परतण्याचा अधिकार आहे असा अनुभव घेतला. पंचवीस तीस वर्षांच्या मुलींना UP खाली तुरुंगात टाकता येत नाही. शिवराज सिंह चौहान म्हणतात, पाला ही राष्ट्रीय आपत्ती घोषित करण्यात यावी म्हणून मी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची भेट घेतली. त्यांनी त्याबाबत एक समिती स्थापन केली आणि मलाही त्या समितीचा सदस्य म्हणून नेमलं. असा एखादा प्रसंग पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल तुम्हाला सांगता येईल? त्यामुळेच मी म्हणतोय की मनमोहन सिंग यांच्या आठवणी जागवताना निरिच्छेने का होईना, पण तुम्हाला पंतप्रधान मोदी आठवतातच.

मनमोहन सिंग दहा वर्ष पंतप्रधान होते. पण आपल्या उणिवा लपवण्यासाठी त्यांनी कधीही धर्माचा आधार घेतला नाही.

....पृष्ठ क्र. १६ वर

## सरतं वर्ष आणि घसरतं भारतीय चलन (रुपया)....

...पृष्ठ क्र. १४ वरुन

विशेषतः, गेल्या दहा वर्षांत लोकांचं, लोकांकडून व लोकांसाठी निवडलेलं सरकार, ही अब्राहम लिंकन यांनी केलेली लोकशाहीची व्याख्या मागे पडून अब्जाधीशांचं, अब्जाधीशांकडून, अब्जाधीशांसाठी निवडलेलं सरकार, ही व्याख्या आता देशात पुरेपूर रूढ झालीय! देशात 'आर्थिक-विषमते'चा नंगानाच एवढा भयानक वाढलाय की, आपला 'राष्ट्रपिता' असो वा आपला घटनाकार 'महामानव' असो; ते दोघेही उरलेत फक्त, कधि सन्मान करण्यापुरते...तर, कधि अपमान करण्यापुरते! त्यांना भारतीय-अर्थव्यवस्थेच्या धोरणमैदानात काडीमात्रही स्थान उरलेलं नाही आणि त्याची क्षिती किंवा शरम सत्ताधाऱ्यांना तर सोडाच; पण, त्या दोघांचाही दिवसरात्र जप करणाऱ्या आणि आपल्या गलिच्छ राजकारणासाठी वापर करणाऱ्या त्यांच्या तथाकथित समर्थकांनाही उरलेली नाही! राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर अथवा धोरणांवर खुली चर्चासत्रं, 'सार्वमत' (Referundum) वगैरे घेणं तर सोडाच; पण, संसद वा विधिमंडळात विधेयकांवर धड चर्चाही सध्या घडवू दिली जात नाही. गौतम अदानी, माधवी बूचसारख्या अनेक धेंडांना वाचवण्यासाठी बेलाशक कुठलीही नीचतम पातळी गाठली जातेय आणि ते आपण उघड्या डोळ्यांनी हताश होऊन पहातो आहोत...आणि, लक्षात घ्या की, नेमकं 'त्यांना' तेच हवंय...म्हणूनच, नववर्ष-२०२५चं स्वागत करताना EVM हटवा...लोकशाही वाचवा...अब्जाधीशांची संख्या, पैसा आणि संपत्ती घटवा अशी निर्धारपूर्वक घोषणा करुया...धन्यवाद!

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**(संयुक्त-महाराष्ट्रानंतर आता, 'स्वायत्त-महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'... 'शिवछत्रपती-राष्ट्र'!)**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



*बाबासाहेब फॅशन नाही तर पॅशन आहे, हे देशाला ठासून सांगणारा हा कर्नाटक विधानसभेचा फोटो...!* ...*Dr. Babasaheb Ambedkar*




*आमच्या अख्ख्या महामानवाची गरजच काय...बस् त्यांचं एक बोट पुरेसं आहे!*
...***राजन राजे*** (अध्यक्ष धर्मराज्य पक्ष)




कॉम्रेड दत्ता केळकर जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने, 'कल्याण सिटीझन फोरम' आयोजित, ''कल्याण–भूषण'' आणि ''कल्याण–रत्न'' पुरस्कार वितरण सोहळा; रविवार, दि. १५ डिसेंबर–२०२४ रोजी, अग्रवाल कॉलेज ऑडिटोरीयम, कल्याण (प.) येथे, मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे, ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत श्री. कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार–लेखक अनिलजी थत्ते, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. विश्वास उटगी, आदि मान्यवर 'प्रमुख पाहुणे' या नात्याने उपस्थित होते.



बित्तंबातमी!

ठाणे । मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ । वर्ष । ४२ । अंक । ६० । पाने । ६ । मूल्य ३ रुपये

कल्याण-भूषण व कल्याण-रत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात

डॉ. साद काझी आणि रवींद्र लाखे यांचा गौरव

कल्याण :

कॉम्रेड दत्ता केळकर जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने, 'कल्याण सिटीझन फोरम' आयोजित, "कल्याण-भूषण" आणि "कल्याण-रत्न" पुरस्कार वितरण सोहळ्यात या पुरस्कार वितरण सोहळ्याचे मानकरी म्हणून, सामाजिक व शैक्षणिकक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे डॉ. साद काझी आणि ज्येष्ठ नाट्य-दिग्दर्शक रवींद्र लाखे यांना गौरविण्यात आले.

रविवारी, अग्रवाल कॉलेज ऑडिटोरीयम, कल्याण (प.) येथे, मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे, ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार-लेखक अनिल थत्ते, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ विश्वास, आदि मान्यवर 'प्रमुख पाहुणे' या नात्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून, डॉ. विजय पंडित; तर, समारंभाचे अध्यक्षपद मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नरेशचंद्र यांनी भूषविले. या पुरस्कार वितरण सोहळ्याचे मानकरी म्हणून, सामाजिक व शैक्षणिकक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे डॉ. साद काझी आणि ज्येष्ठ नाट्य-दिग्दर्शक श्री. रवींद्र लाखे यांना गौरविण्यात आले.

धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांचे विनम्र आवाहन...
'मतपत्रिके' वरील मतदानाचा (Ballot Paper) हक्क परत मिळवण्यासाठी 26 जानेवारी-2025 रोजी रात्री ठीक 9.00 वाजल्यावर फक्त, 5 मिनिटे सगळे लाईट्स बंद ठेऊया आणि 'EVM'वरील मतदानाचा तीव्र निषेध करूया... धन्यवाद,
जय महाराष्ट्र... जय हिंद!

या पुरस्कार वितरण सोहळ्याचे मानकरी म्हणून, सामाजिक व शैक्षणिकक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे डॉ. साद काझी आणि ज्येष्ठ नाट्य–दिग्दर्शक श्री. रवींद्र लाखे यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून, डॉ. विजय पंडित; तर, समारंभाचे अध्यक्षपद, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. नरेशचंद्र यांनी भूषविले.

## मनमोहन सिंग गेले, आता आठवतात ते मात्र पंतप्रधान मोदी!

...पृष्ठ क्र. १५ वरुन

दोन धर्मांमध्ये फूट पडेल असं विधान केलं नाही. जनतेचं लक्ष वेधण्यासाठी किंवा विचलित करण्यासाठी कधीही धार्मिक कार्यक्रमांना हजेरी लावली नाही. निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून देवळांमध्ये गेले नाहीत की महापुरुषांची सोयीस्कर आठवण काढली नाही. मनमोहन सिंग यांचे हे गुण आठवताना आपोआपच पंतप्रधान मोदी आपल्या डोळ्यांसमोर येतात. गरज नसतानाही धर्माचा आधार घेत स्वतःचं रक्षण करणारे विद्यमान पंतप्रधान आपल्याला दिसतातच. मनमोहन सिंग यांचं एखादं खोटं, तेढ माजवणारं, तिरस्कार आणि अहंकारयुक्त भाषण व्हायरल झालेलं दाखवा बरं... शालीन सज्जनपणासाठी तुम्ही मनमोहन सिंग यांचं नाव घेत असाल तर त्याच्या अगदी विरुद्ध टोकावर कोण आहे हे तुम्ही जाणताच.

मनमोहन सिंग यांचे फोटो बघा... त्यात किती साधेपणा आहे. त्यांच्या मागे भव्य सजावट करण्यासाठी आपले पैसे उडवलेले नाहीत. फोटोंमधला साधेपणाच इतका सुंदर आहे की तो साधेपणाच भव्य वाटावा. ते लोकप्रिय नव्हतेच, पण लोकप्रिय होण्यासाठी म्हणून त्यांनी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. दहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी साधं एक फोटोशूट म्हणून केलं नाही. त्यांचे ते साधेसरळ फोटो पहाताना कुणाची आठवण येते? कुंभमेळा म्हणू नका की केदारनाथ, राम मंदिर शिलान्यास म्हणू नका की कन्याकुमारीला जाऊन पंचेचाळीस तास ध्यान करणारा कॅमेरे घेऊन फिरणारा एक एकटा जीव तुम्हाला नक्की आठवेल.

खरं तर पंतप्रधान मोदी आणि मनमोहन सिंग यांच्या यत्ताच वेगळ्या आहेत. मनमोहन सिंग यांच्या डिग्रीबद्दल प्रश्न विचारायची कुणाची प्राज्ञा नव्हती. पंतप्रधान मोदी यांच्या डिग्रीबद्दल मात्र फक्त प्रश्नच विचारले जातात. मनमोहन सिंग यांच्यासाठी भारत हे एक विद्यापीठ होतं. ते ज्या दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते ते बघता कधीही सुट्टी न घेता शांतपणे आपलं काम करणं त्यांच्यासाठी काही विशेष नव्हतं, पण हा प्रोफेसर कधीही त्याचा डांगोरा पिटत नसे. पण प्रोफेसर गंभीर वृत्तीचा आहे म्हणजे त्याचे विद्यार्थीही तसेच असतील असं काही नसतं. ते शिकवत असताना त्यांच्या विद्यार्थ्यांचं लक्ष वर्गात कमी आणि बाहेर जास्त असे. कमीत कमी शिकवेल आणि टिवल्याबावल्या करण्यात वेळ घालवेल असा वेगळ्या वृत्तीचा प्रोफेसर तेव्हा अनेकांना हवा होता.

मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर जो शोक व्यक्त होतोय त्याबद्दल एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी... त्यांच्या ठायी असलेले गुण पंतप्रधान मोदींच्या ठायी असते तर कदाचित हा शोक वेगळा असता. इतिहास मनमोहन सिंग यांच्याप्रती आता दयाळू होत नाही तर तो त्यांना आपल्याबरोबर घेऊन गेलाय. त्यांच्या इतिहासाने भारताच्या वर्तमानावरचा पडदा पुन्हा एकदा बाजूला सारलाय. भारत नावाच्या विद्यापीठातले विद्यार्थी आता वर्गाबाहेर पहातायेत... त्यांच्या डोळ्यासमोर आता मनमोहन सिंग नाहीत तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत.

मूळ लेख – ***रवीश कुमार*** Ravish Kumar (स्वैर अनुवाद – भक्ती बिसुरे)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**